स्वादमय सकाळचा नाश्ता
मिसळपाव, वडासांबर, इडलीसांबर, उडिदवडासांबर,मसालाडोसा, उपमा, उत्तपा, शीरा पुरी भाजी,
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी. रोड,अहमदनगर.फोन :२२४१ २३२४०८०, ९८५०४१९८५०

संस्थापक के. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा
रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. १२.०७.२०२४ | अंक नं. ११३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

अत्याधुनिक नेत्र शिबीर
आता चष्मा घालवा कायमचा
चष्मा नको?
कॉर्नेव्यूरा मिडनन ✲ मोतिबिंदु ✲ काचबिंदु ✲ नेत्ररोपण
डॉ. सांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
मुष्टी खाजगी कारा
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया
✲ शनिवार सकाळी १० ते १ ✲ नोंदणीची आवश्यक
✲ रुग्णांना आय हॉस्पीटल, पुणे ✲ साई ऐपी हॉस्पिटल, मुंबई
वर्धमान, माणिक चौक, अ.नगर ५१५००१
Email : saisuryaa85@yahoo.com
www.saisuryasupervision.com
Help line 9112288611 Appointment 8888982222

स्पर्टीवेअर आकर्षक गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

DISCOUNT
SALE
10% TO 50% DISCOUNT
शर्ट । जीन्स । फॉर्मल ट्राऊझर्स
कॉटन जीन्स । टी शर्ट
FOR THE MEN इंडिया मार्केटिंग
एम.जी.रोड, अहमदनगर । फोन : 2344449

महापालिका आयुक्तांनी पदभार घेताच 'कचरा संकलन यंत्रणे'ची केली पाहणी

सक्कर चौक ते दिल्लीगेट वेशीपर्यंत पायी फिरून घेतला कामाचा आढावा, कायनेटिक चौकातील गार्बेज कलेक्शन सेंटर अन्यत्र हलविणार

नगर – महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी पदाचा कारभार स्वीकारल्यानंतर दुसऱ्याच दिवशी नगर शहरातील कचरा संकलन यंत्रणेची पाहणी केली. आयुक्त अचानक सकाळी सकाळी रस्त्यावर आल्याने कर्मचाऱ्यांची धांदल उडाली.

साफसफाई करणारे कामगार, कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्यांवरील चालक आणि स्वच्छता निरीक्षकांची त्यांनी झाडाझडती घेतली. शहर सुरू होण्याच्या आत स्वच्छ झाले पाहिजे त्यासाठी त्यांनी सर्वांची कानउघडणी केली. नगर शहर स्वच्छ, सुंदर दिसले पाहिजे, यासाठी आपण यंत्रणा अधिक सक्षमपणे कार्यान्वित करणार असून घंटागाड्यांचे वेळापत्रक त्यासाठी अधिक मजबूत करणार आहोत.

कचरा संकलन सकाळ, दुपार, संध्याकाळ घंटागाड्याद्वारे होईलच, सोबत रात्रपाळी करून शहरातील कचरा उचलण्यात येईल. अशा सूचना घनकचरा व्यवस्थापन विभागाला दिल्या आहेत. सक्कर चौकापासून त्यांनी प्रमातफेरीला सुरुवात केली. त्या अगोदर कायनेटिक चौकातील गार्बेज कलेक्शन सेंटरची पाहणी केली. सीना नदी घाट सुशोभीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे मोठा निधी प्राप्त झाला आहे. त्यामुळे येथील गार्बेज कलेक्शन सेंटर दुसरीकडे हलवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार हे सेंटर अन्य ठिकाणी लवकरच हलवण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

शहरात रस्त्यावर फिरून कचरा संकलनाची पाहणी करताना आयुक्त यशवंत डांगे. (छाया – लहू दळवी)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून पुढे माळीवाडा वेस, माणिक चौक मिंगारवाला चौक, तेलीखुंट, नेतासुभाष चौक, चितळे रोड, चौपाटी कारंजा, दिल्लीगेट वेस या मार्गावरून त्यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत पायी फिरून ठिकठिकाणी साफ सफाईबाबत निर्देश दिले. रस्त्यावरील साफसफाई झाल्यानंतर दुकाने उघडतात आणि मग दुकानदार झाडलोट करून तो कचरा पुन्हा रस्त्यावर आणून टाकतात, याबाबत संबंधितांना समज देऊन वारंवार अशा गोष्टी घडल्यास तात्काळ कारवाई करा, त्यांना दंड आकारणी करा असे आदेश देण्यात आले आहेत.

माळीवाडा वेशीजवळील कचराकुंडी बंद करून तो कचरा घंटागाडीद्वारे उचलण्याची कार्यवाही करण्यात आली. २ वर्षांपूर्वी जसे स्वच्छ सर्वेक्षण अभियान यशस्वी करून दाखवले त्याप्रमाणे यावर्षी देखील या अभियानात नगर शहर कुठेच कमी पडणार नाही याचा आपण दृढनिश्चय केलेला असून यावर्षीही मानांकन मिळवून नगर शहराला भरीव असा निधी उपलब्ध करून देऊ, असे डांगे यांनी म्हटले आहे.

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel : (0241) 2416720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

UPGRADE YOUR KITCHEN WITH NEW HOME APPLIANCES
ANYTHING FOR ANYTHING
LIMITED PERIOD OFFER
20% TO 40% OFF ON MEGA EXCHANGE
OPP. GOLD'S TV CENTRE, SAVEDI ROAD, AHMEDNAGAR - 03. PH. : 0241- 2427002
Franchise by DB VENTURES SONY GIFTS PVT. LTD.

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर.
(0241) 2343896/2341196

।। कुलस्वामिनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर–पुणे–नगर
आता आपल्या शहरातून
वरुरोज
■ नगर वेळून स. ७,८,९ व दुपारी १.००
■ पुणे वेळून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
विकअप पॉईंट - भिस्तबाग चौक, क्रांतीचौक सेंटर, तारकपूर, पिंपरीचौक, नाव नोंदवा बुक आपलेच सीट आहेत
पुणे ट्रॉव्ह- वाघोली, वाघाळी वाघाळवाडी, वेताळा, नवीन विद्यानिगम बसस्टॉप बुकिंग आवश्यक
अमर-नीत हॉलिडेज
ऑफिस- भिस्तबाग, अ.नगर
9657746555/ 9226399555

दिप : सुर्दी-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 12 ते 19 जुलै 2024
कल्की (2D) 9.00 AM, 3.30 PM, 10.15 PM
(3D) 12.00 PM, 7.15 PM
सरफिरा 7.30 AM, 10.30 AM, 4.15 PM 7.15 PM, 10.45 PM
हिन्दुस्तानी २ 9.00 AM, 3.30 PM 9.45 PM
रांगडा (मराठी) 12.30 PM
बाई गं (मराठी) 1.30 PM, 7.00 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow CONNPLEX AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

Career DISHA GET READY FOR YOUR JOB
2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA Diploma Course in Graphic & Office Automation JUST IN 8900/-
JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST | CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP | WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Duration : 6 Months
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Kandwal Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Malwada Stand, Station Road, A.nagar
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

Get ready to elevate your dining experience !
Ahmednagar's first
sky
Pure Veg Delight
Rooftop Restaurant.
Starts From
13 July 2024 | 3.00 pm onwards
At
HOTEL SAIDEEP EXECUTIVE
Opp. Kohinoor Mall, Savedi, Nagar - Manmad Road, Ahmednagar
SAIDEEP EXECUTIVE
For Table Reservation Contact 70 304 80 304

"विद्यार्थ्यांना एका गतिशील जगात अग्रिप्रित करणे"
श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट चे
के. जी. कॉलेज ऑफ आर्टस् अँण्ड कॉमर्स, अहमदनगर
Affiliated to Savitribai Phule Pune University and Recognized by Maharashtra State
ISO 14001:2015 / NAAC Accredited
सन २०२४-२०२५ प्रवेश सुरु
के.जी. कॉलेजचं का ?
✲ उत्कृष्ट शिक्षणाची परंपरा
✲ अनुभवी प्राध्यापक
✲ निसर्गरम्य वातावरण
✲ करिअर मार्गदर्शन
✲ विविध उपक्रमांचे आयोजन
✲ Short Term Courses
✲ सुसज्ज इमारत व क्रीडांगण
✲ अद्ययावत ग्रंथालय
✲ अद्ययावत कॉम्प्युटर लॅब
✲ नियमानुसार विविध शिष्यवृत्ती उपलब्ध..
आपले भविष्य शोधा.. के.जी. कॉलेज मध्ये...
कॉलेज मधील विविध अभ्यासक्रम
✲ बी.ए.
✲ बी.कॉम Special Sub.- Banking & Finance / Cost & Work A/c / Marketing Management / Business Administration
✲ बी.कॉम (Computer Application)
✲ बी.कॉम Business Management (Old B.B.A.)
✲ टॅली कोर्स
✲ पत्रकारिता
पत्ता
पंडित नेहरु हिंदी विद्यालय कॅम्पस, L.I.C. ऑफिस जवळ, भुईकोट किल्ला जवळ, अहमदनगर.
संपर्क - मो. +91 9850136654 / 9830756141 / 9075430083
(0241) 2326960. www.kgcollege.in

संपूर्ण स्टेशनरी वस्तूंमध्ये १०% सूट
गिफ्ट अँण्ड स्कूल स्टेशनरी | होलसेल अँण्ड रिटेलर एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझड गिफ्ट अँण्ड टॉईज
आर.एन.आर्ट अँण्ड क्राफ्ट
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर
मो : 9325329061/ 9373417113

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्मिंड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंडेचा
email - navamaratha@gmail.com

पंढरपुरी विठ्ठलाच्या चरणांवरच मुक्ती मिळवणारी...

कलावंतीण पर्पपेत असणाऱ्या कान्होपात्रेस विदरुप्या राजास नजरप्रेश करण्यास जात होते तेव्हा ती बादशहाच्या फौजेस म्हणाली, मला विठ्ठलाचे दर्शन घेऊ द्या.

आर्त, व्याकुळतेने तिनं रिकाम्या देव्हाऱ्यातील (पुजारीविरहीत) विठ्ठलाकडे पाहिले तर साक्षात पांडुरंग बाहू पसरून म्हणत होते, ''कान्हू ये.''

कान्हू बेभान झाली. पितळी उंबरा ओलांडून तिनं गर्भागारात धाव घेत, बेफामपणे, भानरहित अवस्थेत डोळ्यांत अश्रू, ओठांवर हसू अशी संमिश्र भावना घेऊन उत्कट आवेगानं तिनं स्वतःला विठ्ठलाच्या पायावर लोटून दिलं. त्यांच्या पायांना घट्ट मिठी घालून डोकं टेकवलं... ही तिची शेवटची जाणीव होती. पुढच्या क्षणी तिच्या शरीरातून चेतनेची ज्योत बाहेर पडली अन् साक्षात विठ्ठलाच्या हृदयात विलीन झाली. तिचं प्राणतत्त्व स्वतः ला समर्पित करून तिनं आपलं पावित्र्य तर जपलंच होतं पण सर्व संतांच्या मांदियाळीत ती एकमेव सौभाग्यशाली अशी होती जिनं विठ्ठलाच्या चरणांवरच आपला देह समर्पित केला. त्या जगाच्या सर्वांच्च विठुरायाच्या चरणांवर... त्याच्या सर्वांचिक साक्षिध्यात – किंबहुना त्याच्यातल विलीन... तिचं हे जीवन पंढरी, विठुराया व चंद्रभागेसम चिरंजीव, चिरंतन असेल यात शंका ती काय?

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

नगरमधील ओढे व नाल्यांवरील अतिक्रमणे काढावीत; अन्यथा मनपा आयुक्तांच्या दालनात 'ठिय्या आंदोलन'

नगर– नगर शहरातील अनेक ओढे–नाल्यांवर अतिक्रमणे केल्याने सध्याच्या पावसाळी परिस्थितीत नागरिकांच्या घरात, दुकानांमध्ये पावसाचे पाणी, ड्रेनेजचे घाण पाणी येत असल्याने मनपाने तातडीने या ओढे व नाल्यांवरील अतिक्रमणे तातडीने काढावेत. अन्यथा मनसेच्यावतीने आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले जाईल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ यांनी निवेदनाद्वारे मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आला. याप्रसंगी महिला जिल्हाध्यक्ष अनिता दिघे, उपजिल्हाध्यक्ष मनोज राऊत, शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, शहर सचिव डॉ.संतोष साळवे, उपशहराध्यक्ष तुषार हिरवे, उपशहराध्यक्ष संकेत व्यवहारे, उपशहराध्यक्ष किरण रोकडे, उपशहर अध्यक्ष संदीप चौधरी, वाहतूक सेना शहराध्यक्ष अशोक दातरंगे, प्रमोद ठाकूर आदि उपस्थित होते.

नगर शहरातील अनेक ओढे–नाल्यांवर अतिक्रमणे मनपाने तातडीने काढावेत. अन्यथा मनसेच्यावतीने आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले जाईल, असा इशारा मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ यांनी निवेदनाद्वारे मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आला.

निवेदनात म्हटले आहे की, नगर शहर व उपनगरात मिळून लहान मोठे अशे एकूण ४९ ओढे, नाले आहेत. बहुतांश नाल्यावर अतिक्रमण झाले असून, काही ठिकाणी नाल्यांचे प्रवाह बंद करून त्यावर बांधकाम करण्यात आले आहे, तर काही ठिकाणी पाईप टाकून प्रवाह बंदिस्त केले आहेत. पक्की बांधकामे झाल्याने अनेक ठिकाणी प्रवाह अरुंद झाले आहेत व यामुळे पावसाळ्यात ओढे, नाल्यांमध्यून नैसर्गिकरीत्या पाणी वाहून जात नसल्याने हे पाणी रस्त्यावर तसेच नागरिकांच्या घरात शिरते. जोरदार पाऊस झाला तर शहरातील बहुतांशी घरात पाणी जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ओढ्यामधील हे अतिक्रमण हटवावे, यासाठी गेल्या तीन वर्षापासून सातत्याने प्रयत्न करत आहोत. यासाठी मुख्यमंत्री कार्यालय, जिल्हाधिकारी तसेच लोकायुक्त यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत. या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी ओढ्यांमधील अतिक्रमणाबाबत महापालिका अधिकाऱ्यांसमवेत चार ते पाच बैठका घेतल्या. प्रत्येक वेळी महापालिका प्रशासनाला अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले. परंतु मनपा अधिकारी वेळकाढूपणा करत आहेत. विशेष म्हणजे उपलोकायुक्त यांच्यासमोर या विषयावर सुनावणी होऊन मनपा प्रशासनाला अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले, तरीदेखील या आदेशाचे मनपाने दखल घेतली नाही.

यावेळी बोलतांना सचिन डफळ म्हणाले, महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात शहरात ९५ किलोमीटर लांबीच्या ४१ ओढे व नाल्यावर ८.२३ किमी पर्यंत अतिक्रमण झालेले आहे. यात ४.९१ किमी लांबीचे नाले सद्यस्थितीत मोकळ्या जागेत असून ते पाईप टाकून बुजवले आहेत. ज्या ठिकाणी नाले मोकळे आहेत तेथे घराच्या भिंती थेट नाल्याच्या हद्दीत बांधल्याने प्रवाह अरुंद झाले आहेत. अनेक ठिकाणी थेट नाल्यात घराच्या भिंती, पत्र्यांच्या शेड बांधले आहेत. यासाठी नागरिक कुठी मंचाचे शशिकांत चोंडे गेल्या तीन वर्षापासून नगर शहरातील ओढे नाल्यातील अतिक्रमण हटविण्यासाठी सातत्याने लढा देत आहे. तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यासह अनेक सामाजिक संघटनांनी वारंवार आवाज उठवून देखील मनपा याकडे ढोळे झाक करताना दिसत आहे. चार–दोन धनदांडग्या लोकांसाठी महानगरपालिका प्रशासन सामान्य नागरिकांचे प्राण धोक्यात आणत आहेत. तरी या प्रश्नात मनपाने त्वरित दखल न घेतल्यास आपल्या दालनात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात येईल, अशा इशारा सचिन डफळ यांनी दिला आहे.

रिक्षाचालकांसाठीचा ५० रुपयांचा परवाना शुल्क दंड पूर्णपणे माफ

नगर – राज्यातील रिक्षा टॅक्सी मालवाहतूक वाहन चालकांनी आपल्या वाहनाचा परवाना शुल्क वेळेत न भरल्यास त्यांना प्रतिदिन ५० रुपयांचा दंड लावण्यात येत होता, याबाबत राज्यातील विविध रिक्षा संघटनांनी जिल्हा स्तरावर आंदोलने केली होती. याच पार्श्वभूमीवर नगर शहराचे आ. संग्राम जगताप यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे रिक्षा चालकांचा प्रश्न मांडला होता. त्या पार्श्वभूमीवर २८ तारखेला परिवहन सचिव व आयुक्त तसेच अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली.

आ. संग्राम जगताप

रिक्षा चालक सर्वसामान्य कुटुंबातील असून त्यांची उपजीविका रिक्षावरच अवलंबून आहे, प्रतिदिन ५० रुपये दंड भरणे म्हणजे रिक्षा टॅक्सी मालवाहतूक चालकांसाठी हे अन्यायकारक आहे, याबाबत आ. संग्राम जगताप यांनी मांडलेल्या प्रश्नाला यश आले आणि मंत्रिमंडळात विषय मांडला असून राज्यमंत्री दादा भुसे यांनी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर याबाबत ५० रुपयांचा दंड पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय झाला, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

झाडाला गळफास घेत युवकाची आत्महत्या

नगर – शेतातील आंब्याच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेत २१ वर्षीय युवकाने आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील गुंडेगाव शिवारात बुधवारी (दि.१०) दुपारी घडली आहे. महेश सुरेश चव्हाण (रा.गुंडेगाव, ता.नगर) असे मयताचे नाव आहे. महेश याने त्यांच्याच शेतातील आंब्याच्या झाडाला गळफास घेतला. ही बाब लक्षात आल्यावर त्याचा भाऊ राहुल चव्हाण याने त्याला उपचारासाठी दुपारी २.४० च्या सुमारास नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. विशाखा शिंदे यांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. तसी माहिती दवाखाना ड्युटीवर असलेले तोफखाना पोलिस ठाण्यातील पो.ना.बी.एच गायकवाड यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात कळविली. या माहिती वरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

बंधन लॉन ते राजवीर चौकापर्यंत पथदिवे बसवा

महापालिकेने प्रभाग क्र.१ मधील डी मार्ट मागील वडगाव गुप्ता रोड वरील बंधन लॉन ते राजवीर कॉर्नर चौकापर्यंत २२ ट्यूबलर पथदिवे उभे केले आहेत पण त्यावर दिवेच बसविले नाहीत. वर्षभरापासून या रस्त्यावर अंधारात साम्राज्य असून चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. मनपाने या रस्त्यावर तातडीने पथदिवे बसवावेत अशी मागणी येथील नागरिक करत आहेत. (छाया – महावीर पोखरणा)

लालटाकी परिसरात पोलिसांनी पकडले गोमांस

नगर – राज्यात गोवंशीय जनावरांच्या कत्तलीस आणि गोमांस विक्रीस बंदी असतानाही शहरातील लालटाकी झोपडपट्टी परिसरात एका गाळ्यात गोमांस विक्री केली जात होती. ही माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी तेथे छापा टाकून कारवाई केली आहे.

सदरची कारवाई गुरुवारी दुपारी २.२० च्या सुमारास करण्यात आली असून यामध्ये ३० किलो गोमांस, एक लोखंडी वजन काटा व १ सत्तूर पोलिसांनी जप्त केला आहे.

या प्रकरणी पो.कॉ. दत्तात्रय कोतकर यांच्या फिर्यादी वरून रिजवान जमील कुरेशी याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुनानक रेडिमेडसचे मनोहरलाल चूरा यांचे निधन

नगर – मिस्कीनमळा येथील झालानी हॉस्पिटल जवळ राहणारे मनोहरलाल लालचंद चूरा (वय ६४) यांचे ११ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. चूरा हे गंज बाजारातील गुरुनानक रेडीमेडसचे संचालक होते. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी, ३ भाऊ, ३ बहिणी, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

सखुबाई भिसे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – खोसपुरी (ता.नगर) येथील रहिवासी सौ.सखुबाई सोपानराव भिसे (वय ८३) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुन, नातवडे, दीर असा परिवार आहे.

गुन्हे अन्वेषण विभागातील अंगुली मुद्रा विभागाचे महाराष्ट्र राज्याचे संचालक तथा पोलिस अधिक्षक आप्पासाहेब भिसे यांच्या त्या मातोश्री होत.

दिव्यांग लाडक्या बहिणीला ५ हजार रूपये पेन्शन द्या

नगर – नुकत्याच सुरु झालेल्या लाडकी बहिण रु.१५०० या उपक्रमामुळे निश्चिंतच सर्व गरजू, निराधार असणाऱ्या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत आहे. परंतु सुदृढ असणाऱ्या मातामगिनी प्रमाणे समाजातील दिव्यांग माता भगिनीना न धरता वेगळ्या पद्धतीने त्यांचा विचार व्हावा. कारण त्यांची सध्याची परिस्थिती खूपच बिकट स्वरुपाची असल्याने. काही दिव्यांग माता भगिनी आपला व परिवाराचा उदर निर्वाह फक्त संजय गांधी निराधार अनुदान योजने मार्फत मिळणाऱ्या पेन्शन वर करत आहेत. आजही बरेच लाभार्थी हे संजय गांधी निराधार योजना कार्यालयाच्या गलथान कारभारामुळे पेन्शन पासून वंचित आहेत. कार्यालयीन अरेरावी मुळे पेन्शन मिळण्यास दोन तीन महिने विलंब होतो. आमच्या दिव्यांग भगिनीचा गोळ्या औषधाचा होणारा खर्च यामधून कसा तरी भागविला जातो. दैनंदिन जीवनात दिव्यांग व्यक्तींना हक्कासाठी लढावे लागते आज हातात काम नसणारे ८० ते १०० टक्के दिव्यांगत्व असणाऱ्या अनेक भगिनी शासनाकडून मिळणाऱ्या पेन्शनवर जगत आहेत. म्हणून संजय गांधी निराधार योजना अनुदान पेन्शन (Online) पद्धतीने प्रत्येक लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावी. तसेच सरसकट सर्व पात्र 'दिव्यांग लाडक्या बहिणीची' पेन्शन रुपये ५ हजार करण्यात यावी. अशी मागणी भाजप दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे यांनी केली

दिव्यांग लाडक्या बहिणीला ५ हजार रूपये पेन्शन द्यावी अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी साळीमठ यांना देताना भाजप दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे.

दिव्यांग असणाऱ्या लाडक्या बहिणीला ५ हजार रु. पेन्शन द्या या मागणीसाठी भाजप दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनद्वारे मागणी करण्यात आली, यावेळी जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे यांच्यासह महिला जिल्हा अध्यक्षा आशाताई गायकवाड, जिल्हा सचिव चंद्रकांत काळे, तालुका अध्यक्ष श्रीकांत काळे, लगड, ढाकणे, राघाताई पठाडे, प्रिया गायकवाड आदी उपस्थित होते.

तसेच यावेळी दिव्यांगांच्या विविध प्रश्न देखील या निवेदनात नमूद करण्यात आले असून यात दिव्यांग व्यक्तीसाठी आधार कार्डची समस्या देखील मांडण्यात आली असून सर्व दिव्यांगांना आधार कार्ड मिळण्यासाठी यावेळी लवकरच प्रत्येक तालुक्यात कॅम्प घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांनी यावेळी सांगितले.

सुभाषचंद्र नावंदर यांचे निधन

नगर – संगमनेर येथील रहिवासी सुभाषचंद्र लक्ष्मीनारायण नावंदर (वय ८०) यांचे १० जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर संगमनेर येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. संगमनेर मर्चन्ट बँकेचे संचालक मधुसूदन नावंदर व मेघनंद कोल्ड स्टोअरेजचे संचालक पुरुषोत्तम नावंदर यांचे वडील व नंदलाल मणियार यांचे मेहुणे होत. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

रोहिदास भिंगारदिवे यांचे निधन

नगर – नगर तालुक्यातील दरेवाडी येथील रहिवासी रोहिदास उर्फ बाळू भिंगारदिवे (वय ४६) यांचे १२ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर दरेवाडी येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात वडील, भाऊ, बहिण, पत्नी, २ मुले असा परिवार आहे. माजी जिल्हा परिषद सदस्या पुनमताई भिंगारदिवे यांचे ते पती तर माजी जिल्हा परिषद सदस्या दिवंगत शारदाताई भिंगारदिवे यांचे चिरंजीव होत.

गणेश हजारे यांचे अल्प आजाराने निधन

भिंगार – येथील राधानगरीमध्ये राहणारे गणेश बाबासाहेब हजारे (वय ३७) यांचे ९ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, भाऊजय असा परिवार आहे. महात्मा फुले मल्टिस्टेट कर्मचारी पतसंस्थेतील कर्मचारी संदीप हजारे यांचे ते बंधू होत.

मनपाच्या जन्म–मृत्यू विभागातून लवकरात लवकर दाखले मिळावे, यासाठी नगरसेवक अविनाश घुले यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांना आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

जन्म–मृत्यू दाखल्यासाठी नागरिकांच्या मनपात चकरा

माजी नगरसेवक अविनाश घुले यांची आरोग्य अधिकाऱ्यांशी चर्चा

नगर – सध्या शासनाच्यावतीने नागरिकांसाठी विविध योजना सुरु केल्या आहेत. या योजनांचा लाभ मिळण्यासाठी विविध दाखल्यांची गरज भासते. त्यासाठी नागरिकांना मनपामधील जन्म–मृत्यूच्या दाखल्यांसाठी चकरा माराव्या लागत आहेत. सध्या शासनाने महिलांसाठी सुरु केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेसाठी जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. त्यासाठी महिलांची मनपामध्ये गर्दी होत आहे. याबाबत नागरिकांनी माझ्याशी संपर्क साधला असता मनपा आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे यांच्याशी याबाबत चर्चा केली व नागरिकांना तातडीने दाखले देण्यात यावी, अशी मागणी केली आहे. मनपाकडून नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी. नागरिकांना याबाबत काही अडचणी असल्यास आपल्याशी संपर्क साधावा, असे आवाहन माजी नगरसेवक अविनाश घुले यांनी केले.

मनपाच्या जन्म–मृत्य विभागातून लवकरात लवकर दाखले मिळावे, यासाठी नगरसेवक अविनाश घुले यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांना आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

यावेळी डॉ.अनिल बोरगे यांनी मनपाच्या माध्यमातून नागरिकांना जन्म–मृत्यू दाखल्याबाबत नियमानुसार काम सुरु आहेत. प्रत्येक दाखल्यांसाठी विशिष्ट कालावधी निर्गमित केला आहे. त्यानुसार दाखले देण्यात येत आहे. नागरिकांची गैरसोय टाळ्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या जात आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

१५ जुलैपासून ५ दिवस मोफत राजयोगा मेडिटेशन कोर्स

नगर – खास लोकआग्रहास्तव १५ ते १९ जुलै या ५ दिवसात संध्या ७ ते ८.३० या कालावधीत साई सूर्य नेत्रसेवा, मणिक चौक, अ.नगर येथे मोफत स्वरूपात राजयोगा मेडिटेशन होत आहे. या कोर्समध्ये अभ्यास डॉ. सुधा कांकरिया मार्गदर्शन करणार आहेत. याचा लाभ घ्यावा असे ब्रह्माकुमारीज गीतापाठशाळा आणि रोटरी पीस सेंटर द्वारा आवाहन करण्यात येत आहे. याची नांवनोंदणी करणे आवश्यक असून त्यासाठी संपर्क प्रिया दिदी ९८५०८८७३८ यांच्याशी करावा असे संयोजक कळवतात.

वय वर्ष १० पेक्षा जास्त वयोगटातील स्त्री पुरुषांना यात सहभागी होता येईल. हा कोर्स ब्रह्माकुमारीज् गीता पाठशाळा आणि रोटरी क्लब ऑफ अहमदनगर संचलित रोटरी पीस सेंटर यांच्या संयुक्त विद्यमानाने होत आहे.

सध्याचे जीवन अधिक धकाधकीचे झाले आहे. लहान मुलांपासून, तरुण, वृध्दांना तसेच प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तींना अनेक प्रकारच्या ताणतणावाला सामोरे जावे लागते. जीवन गुंतागुंतीचे बनू पहात आहे. यासाठी मन शांत होणे, मनाची स्थिरता आणि शक्ती वाढणे आवश्यक आहे. मेडिटेशनद्वारे मनाचे सामर्थ्य वाढते, रोगप्रतिकार शक्ती वाढते, जीवनात येणाऱ्या अनेक समस्यांना सामोरे जाऊन त्याचे समाधान प्राप्त करण्यास मदत होते, तसेच उच्च रक्तदाब, हृदयरोग, कॅन्सर, ॲसिडिटी, मायग्रेन ई. रोगावरही मात करण्याचा चांगला फायदा ध्यानाद्वारे होतो. अशी माहिती या प्रोजेक्टच्या चेअरमन आणि राजयोगा मेडिटेशनच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली. हा कोर्स मोफत असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन रोटरी अध्यक्ष रो. नितीन थाडे व सचिव सुभाष गर्जे यांनी केले आहे.

मुंबईच्या शिवसेना भवनमध्ये आनंद लहामगे यांचा सत्कार

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आनंद लहामगे यांची उत्तर महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या जॉइंट सेक्रेटरीपदी निवड झाल्याबद्दल मुंबई येथे शिवसेना भवनमध्ये खासदार तथा पक्षाचे सचिव अनिल देसाई व माजी खासदार विनायक राऊत यांनी त्यांचा सत्कार केला.

गृहिणी

आरोग्य

आरोग्यदायी पालक

पालकमध्ये रक्तशोधक गुणधर्म असल्यामुळे यकृताचे विकार, कावीळ, पित्तविकार यामध्ये उपयुक्त आहे. आतड्यांची ताकद वाढविण्यासाठी व त्यांना क्रियाशील बनविण्यासाठी पालकचा एक ग्लासभर रस अनशेपोटी नियमितपणे सेवन करावा. याच्या सेवनाने आतड्यांतील मलाचे निस्सारण होण्यास मदत होते व शौचास साफ होऊन पोट स्वच्छ राहते.

पाककला

हरब्याच्या डाळीचे गुलाबजाम

साहित्य – १ मोठी वाटी हरब्याची डाळ, अर्धी वाटी खवा, अर्धी वाटी मैदा, चिमूटभर खायचा सोडा, २ चमचे साजूक तूप, ५-६ वेलदोड्यांची पूड, पाकासाठी ३ वाट्या साखर, ३ वाट्या पाणी.

कृति – साखर व पाणी एकत्र करून एकतारी पाक करावा. पाकात वेलदोड्यांची पूड घालावी. हरब्याची डाळ शिजवून घ्यावी. नंतर चाळणीवर ओतून पाणी निथळावे. शिजलेली डाळ पुरणयंत्रावर वाटून घ्यावी. खवा कुस्करून घ्यावा. मैद्याला तूप चोळून घ्यावे.

नंतर हरब्याची शिजवून वाटलेली डाळ, मैदा, खवा व खायचा सोडा एकत्र करून गोळा तयार करावा. नंतर ह्या मिश्रणाचे गुलाबजामसारखे लांबट गोळे करून तळून घ्यावेत. गडद रंगावर येईपर्यंत तळावे व तळल्यावर लगेचच पाकात टाकावेत.

सौंदर्य

त्वचेचा तेलकटपणा कमी करण्यासाठी

* आपली त्वचा ऑयली असेल, तर चमचाभर गुलाब पाण्यात चमचाभर लिंबाचा रस मिसळून कापसाने चेहरा स्वच्छ करा. आठवड्यातून दोन वा तीन वेळा या क्लिंजरचा वापर केल्यास तेलकटपणा कमी होईल व चेहराही काळा पडणार नाही.

* उन्हात फिरल्याने त्वचा काळपट पडते तेव्हा ताज्या काकडीचा रस लावा. वाळल्यानंतर चेहरा धुऊन काढावा.

* चंदन+आंबेहळद+संत्रासाल आणि मुलतानी माती यांचा लेप आठवड्यातून दोन वेळा लावून तो अर्ध्या तासाने धुऊन टाकावा. तारुण्य टिकविण्यासाठी याची मदत होते.

वास्तू

जर घरात प्रवेश करण्यापूर्वी भिंत आड येत असल्यास गणेशाचा फोटो लावावा. एक स्वस्तिक चिन्ह लावावे.

सल्ला

* लिपस्टिकच्या रिकाम्या केस सुयापिना, हुक्स इ. छोट्या वस्तू ठेवण्यासाठी वापरा.

* च्युइंगम चावल्याने मानसिक क्षमतेत पन्नास टक्के इतका फायदा होऊ शकतो. याने आपला हार्ट रेट वाढतो आणि या कारणाने रक्ताचा असरही वाढतो. यामुळे मेंदूतील ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. यामुळे स्मरणशक्तीमध्ये अधिक फायदा होतो.

संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

शनिवार, दि. १३ जुलै २०२४

हस्त १९।१५, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : जर आपणास आपले निवासस्थान बदलण्याची इच्छा असेल तर आजचा दिवस उत्तम आहे.

वृषभ : आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी करू शकता. कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम कराल. लेखन कार्यातील अडचणी दूर होतील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील.

मिथुन : व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. जोडीदाराशी वादविवाद टाळा. यथायोग्य विचार करून कार्य करा अडचणी येण्याची शक्यता आहे.

कर्क : आपल्या कार्यातील अडचणी दूर होतील. अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. अपत्यांचा सहयोग मिळेल. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील.

सिंह : व्यापार-व्यवसायासाठी आज दिवस उत्तम राहील. एखाद्या मित्राचे प्रशंसनीय सहकार्य मिळेल. राजकीय कार्ये पूर्ण होतील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील.

कन्या : दिवस अनुकूल व महत्वाचा असेल. आपले अडकलेले कार्ये पूर्ण होतील. आनंदाची बातमी मिळेल. नोकरदार व्यक्तींसाठी स्थिती अनुकूल राहील.

तूळ : महत्वपूर्ण व्यक्तींशी संपर्क फायद्याचे राहतील. राजकीय व्यक्तींसाठी देखील स्थिती सुखदायक राहील. संपत्तीच्या खरेदी-विक्रीसाठीही उत्तम दिवस. नवीन करार होतील.

वृश्चिक : आरोग्य उत्तम राहील. नोकरदार व्यक्तींसाठी वातावरण अनुकूल राहील. आरोग्य उत्तम राहील. सर्जनशील व्यक्तींना वाव मिळेल.

धनु : कौटुंबिक सहयोग मिळेल. शत्रूवर्ग निष्प्रभावी राहील. श्रम अधिक झाल्यामुळे दमल्यासारखे वाटेल. मनोरंजनावर खर्च होईल.

मकर : एखादे काम न झाल्यामुळे अप्रसन्न राहाल. विशिष्ट कार्य पूर्ण होतील. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील. दिवस आनंदात व्यतीत होईल.

कुंभ : आरोग्य उत्तम राहील. कौटुंबिक वातावरण आनंददायक राहील. आरोग्याच्या दृष्टीने उत्तम वेळ आहे.

मीन : कुटुंबात वेळ चांगला जाईल. वरिष्ठ लोकांचे कामात सहकार्य मिळेल. मनोरंजनावर खर्च होईल. आरोग्य उत्तम राहील.

संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

शब्दगंध क्र. ६९६५ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) भारतातील एक घटकराज्य ५) फिकीर; तमा ६) येणेजाणे; शेत; राबता ७) ध्वनी; नाद; रव ९) फटीतून येणारा प्रकाशकिरण ११) डाग; कलंक; पर्वत; वस्तू १२) कनक; कांचन सोने १३) यशस्विता; भरभराट १५) वाचण्याची क्रिया; पठण १६) मग्न; लीन; रममाण १७) दूर्दैवी; कपाळकरंटा २०) पांडवांचा मोठा भाऊ ज्याचा जन्म सूर्यापासनेमुळे झाला होता २१) मृत पतीच्या शरीराबरोबर स्वतःचे दहन करून घेणारी स्त्री; पतिव्रता; पार्वती २२) शेत; जंगल; वन; वावर

उभे शब्द :- १) मध्यभागचा; सेंटरचा २) साहित्य लेखनातील एक प्रकार ३) भगवान; ईश्वर ४) धनुष्याचा जोडीदार; बाण; तीर ५) एक चर्मवाद्य; मृदंग; पखवाज ८) जग; विश्व; दुनिया ९) आवरण; टरफल; साल १०) गुजरातमधील एक नदी १२) चांगल्या वासाचे; सुगंधी १४) रत्न १७) सत्त्व; परीक्षा; चाचणी १८) रुग्णापासून बनणारा एक गोड पदार्थ १९) एक तंतुवाद्य

शब्दगंध क्र. ६९६४ चे उत्तर

सं	स	द		स	ला	म	ल		
गी	ता	क	ला	ला		द	न		
प	द		स	न	जू	त			
न		पा	व		न		घां		
	पा	क		ड		बा	ज		
फ	ल	स		ल	व	क	र		
क्र	व		लि	ख	ि		पा		
	स	म	व	ड		भा	ट		

फिल्मीचक्कर क्र. ९१४६ चे उत्तर

आ	जा	नु	ब	को	पु	का	रे		
ने		म		ई		जी			
से	सा	ल		ले		ले			
उ	क	न	चा	ल	री	ला		बी	
स		ही			री		सा	ल	
के		दे	व	दा	स			क	
आ		खा		ति				क	
ये			म	जी	दे	श	ले		

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : प्रत्येक मनुष्याला स्तुती इतकी प्रिय असते की, त्याच्या सर्व कार्याची मूळ प्रेरणा तीच बनते. **– जॉन्सन.**

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

एव्हील कशासाठी वापरतात?

एव्हील ही मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी गोळी आहे. सर्दी-पडशाने त्रस्त माणसाला औषध दुकानदार एव्हीलची गोळी सामान्यतः देताना आढळतात. एव्हीलमध्ये फेमिरेमिन मॅलिएट नावाचे औषध २५ मि.ग्रॅ इतके असते. या औषधाचा शरीरातील स्वयंचलित मज्जासंस्थेवर परिणाम होतो व त्यामुळे विविध ग्रंथीतून निर्माण होणाऱ्या स्त्रावांच्या प्रमाणात घट होते. याचाच परिणाम म्हणून गळणारे नाक थांबते. पण त्याचबरोबर त्वचा कोरडी होते. तोंड कोरडे पडणे अशा गोष्टीही होतात.

दिवसातून तीन गोळ्यांच्यापेक्षा जास्त गोळ्या कधीही घेऊ नयेत. तसेच लहान मुलांना किती प्रमाणात औषध द्यायचे ते डॉक्टरच ठरवू शकतात. त्यामुळे आपण निर्णय न घेतलेलाच बरा. विषणूंमुळे वा ॲलर्जीमुळे होणाऱ्या सर्दीसाठी एव्हील हे परिणामकारक औषध आहे; पण या औषधाचे दुष्परिणामही आहेत. एव्हील गोळी घेतल्याने व्यक्तीला झोप येते. त्यामुळे एव्हील घेऊन वाहन चालवणे धोक्याचे ठरू शकते. दुसरे म्हणजे एव्हीलचा परिणाम असतो. परिणाम संपल्यानंतर परत जास्त सर्दी होते. सर्दीसाठी खरे पाहता औषध घ्यायची गरज नसते. सर्दी हा आपोआप बरा होणारा रोग होय. नाक गळणे थांबण्यासाठी पाण्यात मीठ टाकून त्या द्रावणाचे दोन-चार थेंब नाकपुड्यांत टाकावेत. तसेच पाणी उकळवून त्याची वाफ घ्यावी. या उपायांमुळे बराच फायदा होतो व मुख्य म्हणजे औषधांचे दुष्परिणामही टाळता येतात.

लबाडांची मैत्री

एक गुबगुबीत अंगाचा भित्रा ससा बिळात आनंदात राहत होता. एकदा त्याला दिसले की, एक कोल्हा बिळाच्या तोंडाशी बसून त्याचीच वाट पाहून कंटाळलेला कोल्हा निघून गेला.

असे काही दिवस गेले नाहीत, तोच एकदा सशाला दिसले की, तो कोल्हा आणि एक मांजर बिळाच्या तोंडाशी बसून काही तरी सल्ला मसलत करीत आहेत.

हे पाहून ससा फारच घाबरला. कोल्हा बिळात येऊ शकणार नाही, पण त्या मांजराचे काय? असा तो विचार करीत असता मांजर रांगत रांगत बिळात घुसले आणि सशाला पंजे मारू लागले. तसा ससा घाबरून बिळाबाहेर पडून जिवाच्या भीतीने पळू लागला, पण पाठलाग करून कोल्ह्याने झडप घालून त्याला पकडले आणि ती दोघे मिळून सशाचे लचके तोडू लागले.

मरता मरता ससा मनात म्हणाला,

''मला संशय आलाच होता. तुम्च्या दोघांची मैत्री म्हणजे माझ्या जिवावरचे संकटच.''

तात्पर्य : दोन लबाडांची मैत्री झाली की काही तरी कट शिजणार हेच खरे.

जीवन चक्र

लाकूडतोड्याचा या गोष्टीची जाणीव झाली की मी एक सुवर्णसंधी गमावली. आता थोडीच झाड शिल्लक होती. ती त्याने जास्त किंमतीस विकली व तो श्रीमंत झाला व आपले जीवन सुखाने घालवू लागला. लाकूडतोड्याची ही गोष्ट आमच्या जीवनाची गोष्ट आहे. आम्हांस आपल्या जीवनामध्ये जे श्वासोच्छ्वास मिळाले आहे ते म्हणजे चंदनाचे वृक्ष होय. त्या लाकूडतोड्या प्रमाणेच आम्ही आपल्या जीवनातील अधिकतर आपले मौल्यवान श्वास वाया घालविले आहोत. आम्हांस मिळालेल्या उपहारा पासून आध्यात्मिक खजिने प्राप्त करण्याऐवजी आम्ही आपला वेळ वाया घालवित आहोत. हा वेळ, काळ, अत्यंत अनमोल आहे. एकदा का ही वेळ, काळ निघून गेला तर तो आम्ही परत प्राप्त करू शकत नाही. तर या आपण आपणास मिळालेल्या मौल्यवान (तुकाराम महाराज यास म्हणतात मोलाचे आयुष्य वेचूनिया जाय) वेळेचा, आयुष्याचा, श्वासांचा सदुपयोग करू या. जर आम्ही असे केले तर आम्ही स्वप्नातही ज्याचा विचार करणार नाही इतके आध्यात्मिक धन मिळवू.

प्रत्येक क्षणाचे म्हत्व सांगणारी एक म्हण आहे. आम्ही कोणत्या गोष्टीमध्ये तो क्षण घालवित आहोत? आम्ही तो क्षण क्रोधात मोहाच्या विचारांमध्ये घालवू इच्छितो का? आम्ही तो क्षण भूतकाळाच्या आठवणींमध्ये वा भविष्यकालाच्या चिंतनामध्ये घालवू इच्छितो का? आम्ही तो क्षण मनोरंजन, करमणूकी मध्ये घालवू इच्छितो का? ज्याची आमच्या दृष्टीने काही किंमत नसते, काय आम्ही अशा क्षणांना, अशा घटनांमध्ये घालवू इच्छितो का ज्यामुळे आम्ही हे जाणू शकू की, आम्ही कोण आहे आणि आम्ही ह्या भूतलावर कशा करीता आलो आहे आणि आमच्या जीवनात सर्वात मौल्यवान गोष्ट कोणती आहे?

आम्ही ह्या भवसागरामध्ये आमचे लक्ष्य माहित नसतांना वाहत चालतो आहे. आम्ही आमच्या जीवनातील काही क्षण, आम्हांस कोणत्या दिशेस जावयाचे आहे? अशा विचारांमध्ये घालवितो का? माझे आध्यात्मिक गुरू परमसंत कृपालसिंहजी महाराज ह्यांनी आपल्या बालपणीच आपल्या जीवनाबद्दल विचार केला होता की मला जीवनात काय प्राप्त करायचे आहे?

माझ्या जीवनाचे लक्ष्य कोणते? यावर चिंतन मनन केल्यानंतर त्यांनी निर्णय घेतला की माझ्यासाठी प्रभू प्रथम व नंतर जग, संसार आणि त्यांनी निर्णय घेतला की मला स्वतःला ओळखावयाचे आणि प्रभुची प्राप्ती करावयाची आणि हे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून त्यांनी आपला मार्ग निश्चित केला, आणि जोपर्यंत ते ध्येयापर्यंत पोहचले नाही तो पर्यंत ते थांबले नाही चालतच राहिले.

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

यह सब सुनने-समझने के बाद मुझे यौगिक खेती करने की प्रेरणा मिली और मैंने निश्चय किया कि यौगिक खेती जरूर करनी ही है। मेरा तो अनुभव यह है कि जब से हमने यौगिक खेती शुरू की है तब से हमने प्रकृति के पाँचों तत्वों को शुभ भावना का दान करना शुरू किया है, जिसके फलस्वरूप अब तक मेरे शरीर में भी कोई बीमारी नहीं आई है इसलिए मैं ऋषि बनकर कृषि करने की प्रेरणा से ही आगे बढ़ रहा हूँ। सबसे पहले १० नवंबर २०११ को मैंने गेहूँ अनुसंधान निर्देशालय, करनाल के प्रधान वैज्ञानिक डॉ. सुभाष गिल के मार्गदर्शन में दो एकड़ भूमि में विधिपूर्वक यौगिक खेती के तहत गेहूँ के फसल की बुआई की। और श्रेष्ठ संकल्प किया था कि इस खेती से जो शुद्ध अन्न निकलेगा, उससे परम पिता परमात्मा श्री-श्री शिवबाबा को भोग स्वीकार कराऊंगा। मेरी यह भावना पूरी हुई है और शिवबाबा ने भोग स्वीकार किया भी, इससे मैं बहुत खुश हूँ। मैंने अपने खेत में योग के प्रयोग किये और परिणाम भी बहुत सुंदर एवं अच्छे मिले। ये सब प्रयोग मैंने उपरोक्त वैज्ञानिक की देख-रेख में किये।

इन वैज्ञानिकों के साथ विचार-विमर्श करने से पता चला कि पौधों में संवेदनायें होती हैं, वे भी अच्छे-बुरे विचारों पर प्रतिक्रिया देते हैं। बच्चों की तरह दुलारने से और फसलों को परमात्मा का प्यार तथा शक्ति प्रदान करने से पौधे बहुत सुंदर रूप से विकसित होते हैं, शक्तिशाली बनते हैं तो अन्न भी शुद्ध और पौष्टिक शक्तिशाली ही निकलेगा।

नियमित रूप से खेती में आधा घण्टा तथा अमृतवेले के समय में घर से फसलों को राजयोग के माध्यम से शुभ संकल्प और शक्तिशाली वायब्रेशन्स देता था। खेती में चक्कर लगाते समय और खेती में काम करते समय पौधों को प्यार से दृष्टि देता था। पुराणमध्ये एका गरीब लाकुडतोड्याविषयी एक गोष्ट सांगितलेली आहे. तो आपला उदरनिर्वाह चालविण्याकरीता अत्यंत मेहनत करीत असे. एके दिवशी तो लाकूडतोड्या जंगलाच्या ज्या भागामध्ये लाकूड तोडीत होता, तेथून त्या राज्यातील राजा शिकारीसाठी जात होता.

त्याची नजर या लाकूडतोड्यावर पडली तेव्हा त्या लाकूडतोड्याची गरिबी बघून राजास त्याची दया आली आणि ह्याची काही मदत करावी असे राजाच्या मनात आले.

राजा त्या लाकूडतोड्यास संबोधून म्हणाला की, माझ्याजवळ काही जमीन आहे. तिच्यामध्ये काही चंदनाची झाडे आहे. मी ती जमीन तुला देतो त्यातील चंदनाची झाडे विकून तू धनवान होशील.

लाकूडतोड्याने राजाचे आभार मानले. लाकूडतोड्याने राजाने दिलेल्या जमीनीवरील चंदनाची लाकडे तोडली व ती लाकडे सामान्य लाकडांच्या किंमतीत विकली, कारण त्यास चंदनाच्या लाकडांचे महत्त्व माहित नव्हते. लाकूडतोड्याने जेव्हा बरचशे वृक्ष तोडून विकली होती तेव्हा राजा तेथे आला. राजाला अशी अपेक्षा होती की आतापर्यंत लाकूडतोड्या श्रीमंत झाला असेल परंतु राजास त्या लाकूडतोड्यास बघून धक्का बसला कारण तो आजही गरीबच होता.

राजा त्या लाकूडतोड्यास म्हणाला की, ''चंदनाची झाडे अत्यंत किमती आहे आणि ते विकूनही तू जास्त पैसै का कमविले नाही?''

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

एक प्राध्यापक आपल्या बायकोला रोज पान खायला देत.

लग्नानंतर एक-दीड वर्ष गेल्यावर बायको म्हणाली,

''अहो, लग्नानंतर पहिले दोन-चार महिने माझं कौतुक म्हणून तुम्ही पान दिलंत हे ठीक पण यापुढे देऊ नका.

उगाच कशाला ते खर्चिक कौतुक?''

प्राध्यापक म्हणाले, ''अगं एक पान खाल्ल्यानं तू निदान पंधरा मिनिट तरी बोलू शकत नाहीस. म्हणून मी तुला पान देतो समजलीस''

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



खाळाचे डोळे अर्धोन्मिलित होऊन जातात
झोपेची झापड डोळ्यांची पकड घेते
ही झोप येते कुठून
ते ठाऊक आहे का कोणास?

मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर

मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,

भिंगार मो. ९४०३७३४२८१

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

पाळी थांबल्यावर आपले स्वीत्व संपले. आता मी पतीला लैंगिक संबंधातून समाधानी करू शकेन का, तसेच पतीला आता माझी गरज नाही, अशा भावना मनात येतात. कधी कधी या भावना एवढ्या तीव्र असतात, की अचानक छोट्याशा कारणावरून स्त्री चिडचिड करायला लागते व लगेच रडायलाही लागते. नैराश्यामध्ये घरातील मुले-मुली, सुना, पती या सर्वांवर राग धरला जातो. रजोनिवृत्तीची ही लक्षणे कमी करण्यासाठी व तिच्या सुदृढ आरोग्यासाठी जागरूकता बाळगायला हवी. त्यासाठी डॉक्टरांचा सल्ला व मार्गदर्शन, रक्त-लघवी यांच्या विशिष्ट तपासण्या, योग्य आहारविहार, योगासने, सकारात्मक दृष्टिकोन यांचा मनापासून स्वीकार करावा.

१) डॉक्टरांचा सल्ला : रजोनिवृत्तीची लक्षणे दिसू लागल्यानंतर रक्त लघवीच्या तपासण्या करून घ्याव्यात. रक्तदाब, नाडीचे ठोके, वजन तपासून घ्यावे. खूप नैराश्य जाणवत असेल तर त्वाबद्दल डॉक्टरांना सांगावे. डॉक्टरांना रजोनिवृत्तीची लक्षणे जास्त प्रमाणात जाणवत असतील तर स्त्रीला HRT (हार्मोन्स रिप्लेसमेंट थेरपी) चालू करतात. अल्प प्रमाणात इस्ट्रोजनची मात्रा देणे म्हणजेच HRT होय. यामुळे स्त्रीचे शरीर पुन्हा पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला जातो. N मात्र स्तनांचा, गर्भाशयाचा कर्करोग, यकृताचे आजार असे काही विकार असतील तर डॉक्टर HRT उपचार देण्याचे टाळतात. HRT अनेक प्रकारांद्वारे घेता येते.

१) गोळी : तोंडावाटे रोज किंवा ठरावीक कालखंडाने घेता येते.

२) योनिमार्गाला आतून जेल लावणे

३) पोटावर क्रीम चोळून लावणे

४) कंबरेखाली पँच चिकटवणे. हा पँच साधारणतः आठवड्यातून दोन वेळा बदलावा लागतो.

इस्ट्रोजन हार्मोन्सच्या कमतरतेमुळे भावी आयुष्यात उद्भवणाऱ्या हृदयरोग, उच्च रक्तदाब, मधुमेह, अति कोलेस्टेरॉल, मेंदू विकार, त्वचेतील बदल, कंबरदुखी, गुडघेदुखी या आजारांची शक्यता कमी करणे हा HRT घेण्याचा उद्देश आहे.

२) विशिष्ट रक्त-लघवी तपासणी : लिपीड प्रोफाइल, रक्तशर्करा तपासणी, रक्ताचे प्रमाण व लघवीची तपासणी करून घ्यावी. या तपासण्यांमध्ये दोष आढळल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार करावेत.

(क्रमशः)

– डॉ. शारदा निर्मल-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहमदनगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

आरोग्यसेवेपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी नगरमधील आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य सर्वदूर

संपतलाल बाफना यांचे प्रतिपादन; किडणी विकार तपासणी शिबिरास प्रतिसाद

आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे बाफना परिवारातर्फे आयोजित किडणी विकार तपासणी शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना संपतलाल बाफना. समवेत डॉ. प्रकाश कांकरिया, नरेंद्र बाफना, अक्षय बाफना व बाफना परिवारातील सदस्य. तसेच संतोष बोथरा, अभय गुगळे, मानकचंद कटारिया आदी.

नगर –आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मनोभावे रुग्णांची सेवा केली जाते. आरोग्य सेवेपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल चे कार्य कौतुकास्पद आहे. समाजातील आर्थिक दुर्बल व गरजू घटकांना सवलतीच्या दरात व मोफत आरोग्य सेवा मिळावी यासाठी मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे घेतली जातात. या आरोग्य शिबिरातून हजारो रुग्णांना दिलासा मिळत आहे. या शिबिरामध्ये बाफना परिवाराला सहभागी करून घेतले आहे.हे बाफना परिवाराचे मात्र समजतो. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य महाराष्ट्रात सर्व दूर पसरले आहे, असे प्रतिपादन उद्योजक संपतलाल बाफना यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे संपतलाल, नरेंद्र, प्रशांत बाफना परिवाराच्या वतीने किडणी विकार तपासणी शिबिराचे उद्घाटन आयोजक संपतलाल बाफना व परिवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी संपतलाल बाफना, नरेंद्र बाफना, अक्षय बाफना, शकुंतला बाफना, वर्षा बाफना, वैशाली बाफना, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, अभय गुगळे, सतिश लोढा, डॉ.प्रकाश कांकरिया, मानकचंद कटारिया, प्रकाश छल्लाणी, डॉ.आशिष भंडारी, शिबिराचे तज्ञ डॉ.गोविंद कासट आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,समाजातील दानशूर व्यक्तींनी जैन सोशल फेडरेशनवर दाखविलेल्या विश्वासामुळे हॉस्पिटलचे सेवा कार्य मोठ्या प्रमाणात सुरू आहे. तसेच आनंदऋषीजी डायलेसिस विभागात ३२ डायलिसिसच्या मशीन आहेत. डायलेसिसच्या रुग्णांना अत्याधुनिक पद्धतीने रुग्णसेवा मिळावी. यासाठी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून चांगल्या क्वालिटीची मशिनरी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.त्यामुळे डायलेसिस रुग्णांचे वयोमानात वाढ होत आहे.

शकुंतला बाफना म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सेवा कार्य महान आहे. या सेवा कार्यात बाफना परिवाराला खारीचा वाटा उचलण्याची संधी दिली आहे. या आरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा.

डॉ.गोविंद कासट म्हणाला, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आत्तापर्यंत एक लाखाहून अधिक रुग्णांचे डायलेसिस यशस्वीपणे झालेले आहेत. तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजने मार्फत रुग्णांचे मोफत डायलेसीस केले जातात. तसेच कार्वाळ ज व कार्वाळ ब असलेल्या रुग्णांनाही डायलिसिसची सेवा दिली जाते. शिबिरात ७० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

के.जी. महाविद्यालय व स्कोप कॉम्प्युटर यांच्यात 'टॅली अभ्यासक्रमा'साठी सामंजस्य करार

टॅली अभ्यासक्रमासाठी के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालय आणि स्कोप कॉम्प्युटर यांच्यात सामंजस्य करार करताना किशोर मुनोत, डॉ. स्वाती मुनोत व स्कोप कॉम्प्युटरचे विनय बिनायके, सौ. सुनिता बिनायके

नगर – येथील श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक विश्वस्त संस्था संचालित के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, इतर शाखीय सर्व विद्यार्थ्यांना तसेच अहमदनगर शहरातील इतर विद्यार्थ्यांना १० वी नंतर देखील रोजगारामिमुखू संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महाविद्यालय पातळीवर टॅली हा व्यवसायिक अभ्यासक्रम महाविद्यालय व स्कोप कॉम्प्युटर यांच्या संयुक्त विद्यामाने उपलब्ध करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर हस्तीमल मुनोत व परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांनी दिली. यावेळी स्कोप कॉम्प्युटरचे विनय बिणायके व सौ. सुनीता विनय बिणायके उपस्थीत होते. यावेळी के. जी. कॉलेज व स्कोप कॉम्प्युटर यांच्यामध्ये करार करण्यात आला.

सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांना व्यवहारिक पातळीवर ज्ञान उपलब्ध होण्यासाठी रोजच्या जीवनाकरिता उपयुक्त असणारे व्यवहारिक ज्ञान विद्यार्थ्यांना देण्यासाठी टॅली हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम महाविद्यालयात उपलब्ध आहे.

के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालय हे अहमदनगर जिल्ह्यातील व्यवसायिक अभ्यासक्रमांचे प्रथम महाविद्यालय असून या महाविद्यालयात अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. या महाविद्यालयातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज अनेक कंपन्यांमध्ये व व्यवस्थापनामध्ये कार्यरत आहेत. महाविद्यालय स्तरावर घेतलेले व्यवसायिक शिक्षण विद्यार्थ्यांना पुढील जीवनामध्ये मार्गदर्शक व करिअर घडवण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. त्यामुळे जास्तीत जास्त या संधीचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये ॲडमिशन घेऊन आपले उज्वल भवितव्य घडवावे.

श्रमण संघीय उपप्रवर्तक श्री श्रृतमूनिजी म.सा. यांचा १४ जुलैला आनंदधाम येथे चातुर्मासानिमित्त मंगल प्रवेश

नगर – राष्ट्रसंत आचार्यसम्राट श्री आनंदऋषिजी महाराज साहेब यांच्या पदस्पर्शाने शहरातील पवित्र स्थान आनंदधाम येथे धर्मप्रेमी श्रद्धाशील श्रावक श्राविकांना चातुर्मासिक आराधना करण्यासाठी आनंदधाम येथे श्रमण संघीय उपप्रवर्तक, दक्षिण दिवाकर, कोटा संघ प्रमुख श्री श्रृतमूनिजी म सा आदि ठाणा ४ यांचा वर्ष २०२४ चा मंगलमय चातुर्मास होणार आहे.

कर्नाटक गज केशरी, घोर तपस्वी परम श्री गणेशलालजी म सा तसेच श्री मिश्रीलालजी म सा यांचे सुशिष्य पू. श्री श्रृतमूनिजी म सा आदि ठाणा ४ यांचा मागील वर्षी हैद्राबाद येथे चातुर्मास झाला होता. संपूर्ण भारतभर जैन धर्माचा प्रचार प्रसार करून त्यांनी अनेक भाविक भक्तांना धर्म आचरण बाबत जागृत करुन मोलाचे मार्गदर्शन केले आहे. श्रमण संघास त्यांचे अनमोल मार्गदर्शन नेहमीच मिळले याबद्दल त्यांना श्रमण संघीय उपप्रवर्तक ही पदवी देण्यात आली असून त्यांचे लाखो भाविक भक्त आहेत. पूज्य महाराज साहेबांचा जीवन परिचय प्रेरणादायक आहे. धर्म आराधना कशी असावी, ध्यान साधना कशी करावी, जीवन कसे जगावे याबाबत स्वाध्याय करुन त्यांनी आपले संयम जीवन सार्थ केले आहे. त्यांना गुरुदेवांचा व गुरुमातांचा आशीर्वाद, सानिध्य, मार्गदर्शन मिळालेले आहे

तप जप साधना, ज्ञान ध्यान आराधना व मानव जीवन सार्थक करण्यासाठी जैन धर्म परंपरेत प्रत्येक वर्षी चातुर्मास अनुष्ठान होत असतात. धर्मप्रेमी श्रद्धाशील श्रावक श्राविकांना चातुर्मासिक आराधना करण्यासाठी या संतांचे बहूमूल्य मार्गदर्शन व विविध धार्मिक कार्यक्रमाचा, प्रवचनाचा लाभ होणार आहे. आपले आचरण कसे असावे, जीवन कसे जगावे याबाबत खास युवक युवती व महिलांकरिता या वर्षीच्या चातुर्मासात त्यांचे अनमोल ज्ञान व मार्गदर्शन अहमदनगर वासीयांना मिळणार आहे. याचा सर्वांनी अवश्य लाभ घ्यावा, असे श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांनी सांगितले.

या सुवर्ण क्षणाचा लाभ घेण्यासाठी व पूज्यवरांच्या स्वागतासाठी १४ जुलै रोजी सकाळी ९.१५ वाजता सारसनगर जैन धर्म स्थानक येथून आनंदधाम येथे संतवृंदांचा चातुर्मास मंगल प्रवेश व भव्य स्वागत होईल. यावेळी पुरुषांनी सफेद वस्त्र तर महिला भाविकांनी लाल, केसरी, पिवळसर साडी परिधान करून उपस्थित रहावे. चातुर्मास प्रारंभ २० जुलैपासून होईल. १४ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता सारसनगर जैन धर्म स्थानक येथे धर्मप्रेमी बंधू भगिनींनी उपस्थित राहावे.

इस्कॉनतर्फे १३ जुलैला रथयात्रा महामहोत्सव

नगर – आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) नगर तर्फे श्री श्री जगन्नाथ बलदेव सुभद्रा रथयात्रा महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नगर शहरातील पाईपलाईन रोडवरील कादंबरीनगरीत असलेल्या इस्कॉनच्या मंदिरातर्फे रथयात्रा काढण्याचे हे पाचवे वर्ष असून १३ जुलै ला दुपारी १ वाजता येथील लालटाकी रोडवरील खाकीदास बाबा मठामधून रथयात्रेचा शुभारंभ करण्यात येईल, अशी माहिती येथील इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास यांनी दिली.

ते म्हणाले, आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाचे संस्थापकाचार्य कृष्णकृपामूर्ति श्री श्रीमद् ए.सी.भक्तिवेदान्त स्वामी प्रभुपाद यांच्या प्रेरणेने नगर शहरातील आणि जिल्ह्यातील भाविकांना श्रीजगन्नाथ रथयात्रा महामहोत्सवाचा आनंद घेता यावा म्हणून इस्कॉनच्या नगर केंद्रातर्फे या सोहळ्याचे आयोजन प्रती वर्षी करण्यात येते आहे.

१३ जुलैला दुपारी १ वाजता नगर शहरातील लालटाकी रोडवरील खाकीदास बाबा मठाच्या प्रांगणामधून निघणारी ही रथयात्रा निळक्रांती चौक, दिल्लीगेट, चौपाटी कारंजा, चितळे रोड, नेताजी सुभाष चौक, नवीपेठ, नगर अर्बन बँक रोड, एम.जी.रोड, तेलीखुंट, सर्जेपुराजवळील खाकीदास बाबा मठात पोहोचेल. तेथेच रथयात्रेचा समारोप करण्यात येईल.

आ. संग्राम जगताप, महेंद्र भैय्या गंधे, जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांच्या प्रमुख उपस्थितीत होत असलेल्या या सोहळ्यात इस्कॉनच्या पुणे मंदिराचे सर्वश्री रूपगोस्वामी प्रभू, रामनिताई प्रभू, रामसेवक प्रभू, मदनमनोहर प्रभू, पितांबर चैतन्य प्रभू सहभागी होणार आहेत. रथयात्रा महामहोत्सवात हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे । हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।। या महामंत्राचे सवाद्य अखंड हरिनाम संकीर्तन चालेल.

रथयात्रेच्या सांगता समारंभात खाकीदास बाबा मठातील मंदिराच्या समभंडाळात रामनिताई प्रभू (पुणे) यांचे सुश्राव्य प्रवचन, दीपदान, छप्पन भोग असे भरगच्च कार्यक्रम या महामहोत्सवात होणार आहेत. महाप्रसाद सोहळ्याने या महामहोत्सवाची सांगता करण्यात येईल.

रथयात्रा महामहोत्सवासाठी इस्कॉनचे भाविक विशेष परिश्रम घेत आहेत. रथयात्रेच्या अग्रभागी घोडयावर भालदार-चोपदार, बैलगाडीवर सनई-चौघडा, गौरनिताईचा छोटासा, जगन्नाथजींचा मोठा रथ, श्रीराम पंचायतनची वेशभूषा करून रथावर विराजमान झालेले भाविक आणि शहराच्या विविध भागांमधील भजनी मंडळ, युवा मंडळ, स्त्री-पुरुष भाविक सहभागी होणार आहेत. रथयात्रा मार्गावर सडा टाकून रांगोळ्या व फुलांच्या पायघड्या घालून पुष्पवृष्टी करत स्वागत करण्याची जय्यत तयारी भाविकांनी केली आहे.

तसेच भगवान श्रीकृष्णास औक्षण करून आरती करता येणार असल्याने रथयात्रा मार्गावरील भगिनींनी स्वयंस्फूर्तीने व श्रध्देने रथयात्रेच्या स्वागताची केलेली तयारी पाहून इस्कॉन मंदिराच्या व्यवस्थापकांसह भाविकांचा उत्साह दुणावला आहे.

भाविकांनी रथयात्रा महामहोत्सवात सहभागी होवून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास यांनी केले आहे.

मोहरम मार्गावरील पॅचिंग दुरुस्त करा, धोकादायक इमारती, अतिक्रमणे हटवा

महानगरपालिका आयुक्तांकडे मागणी

मोहरम मार्गावरील पॅचिंग दुरुस्ती, धोकादायक इमारती व अतिक्रमणे हटविण्याच्या मागणीचे निवेदन महापालिका आयुक्तांना देताना कॉंग्रेसचे शहर जिल्हा उपाध्यक्ष अलतमश जरीवाला.

नगर – हिंदू – मुस्लिम ऐक्याचे प्रतिक म्हणून पाहिला जाणारा मोहरम उत्सव सध्या सुरू झाला आहे. मोहरमध्ये पूर्ण राज्याचे व देशाचे भाविक अहमदनगरमध्ये दर्शनासाठी येत असतात. शहराच्या महत्वाच्या प्रमुख रस्त्यांची अवस्था खूप वाईट झालेली आहे. त्या निमित्ताने मोहरम मिरवणुक मार्गाची रस्त्याची पॅचिंग दोन दिवसांपूर्वी करण्यात आली होती परंतु काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. उलट या पॅचिंगमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खडी व कच पडलेली दिसून आलेली आहे. सवारी मि रवताना खांदेकरी बिना चप्पलने खांदा देत असतात यामुळे भाविक व नागरिकांना अशा प्रकारामुळे पायाला इजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मागील वर्षीही अशाच प्रकारामुळे भाविकांच्या पायाला इजा- जखमा झाल्या होत्या.

सध्या पावसाळा सुरू आहे त्यामुळे मिरवणूक मार्गावर पाहणी केली असताना काही ठिकाणी धोकादायक इमारती आहेत त्या योग्य ती कारवाई म्हणून उतरून घ्याव्यात. काही भागात रस्त्यावर दगड मातीचे ढिगारे पडलेले आहे तेही तातडीने उचलून साफ करून घ्यावेत. याव्यतिरिक्त बाहेरील भाविकांसाठी व महिलांसाठी मोबाईल टॉयलेटची सुविधा कोठला परिसरात व मिरवणूक मार्गाच्या काही भागात उपलब्ध करण्यात यावी अशी मागणी मोहरम उत्सव समितीचे सदस्य व कॉंग्रेसचे शहर जिल्हा उपाध्यक्ष अलतमश जरीवाला मनपा आयुक्तांकडे यांनी केले.

मिरवणूक मार्गाची पाहणी करून तातडीने झालेल्या निकृष्ट दर्जाच्या रस्त्याची पॅचिंग दुरुस्त करणे, धोकायदक इमारत, रस्त्यावरची दगड माती उचलणे या सर्व बाबीबद्दल संबंधित विभागाला त्वरित आदेश द्यावेत. यावेळी मोहरम उत्सव समितिचे खलील सय्यद, सलीम जरीवाला, आय.बी. शाह, नासीर खान, सलीम रेडियमवाला, विश्व मानवअधिकार संघटनेच्या जिल्हा अध्यक्ष अजू शेख, समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव अझीम राजे, असद इराणी, फैयाज शेख, वसीम शेख, परवेझ शेख, शहबाज शेख, आरिफ बागवान, आरिफ शेख व आदी उपस्थित होते.

मोहरम सण शांततामय वातावरणात साजरा करा

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे आवाहन; जिल्हाधिकारी कार्यालयात शांतता समितीची बैठक

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मोहरम सणानिमित्त आयोजित शांतता समितीच्या बैठकप्रसंगी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ व अधिकारी.

नगर – जिल्ह्यात होणारे सण, उत्सव शांततेमध्ये व आनंदात साजरे करण्याची आपल्या जिल्ह्याची परंपरा आहे. ही परंपरा कायम ठेवत मोहरम सण शांततामय वातावरणात साजरा करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मोहरम सणानिमित्ताने शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यात्रसंगी जिल्हाधिकारी सालीमठ बोलत होते.

बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, महानगरपालिकेचे उपायुक्त सौरभ जोशी यांच्यासह शांतता समितीचे, उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले की, शांतताप्रिय उत्सव साजरा करणारा जिल्हा म्हणून आपल्या जिल्ह्याचा नावलौकिक आहे. सणादरम्यान कुठलाही अनुचित प्रकार न घडता अत्यंत शिस्तबद्धरितीने व शांततेच्या वातावरणामध्ये सण साजरा करण्याची जबाबदारी उत्सव समितीमधील पदाधिकारी तसेच सर्व नागरिकांनी आहे. सर्वांनी एकत्र येत हा सण अत्यंत आनंदाने व शांततेमध्ये साजरा करण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी सालीमठ यांनी यावेळी केले.

आषाढी वारीसाठी पंढरपूर येथे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी प्रशासनामार्फत अनेक सोई-सुविधा गतवर्षापासून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे मोहरम सणासाठी नागरिकांना आवश्यक त्या सर्व सुविधा प्रशासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात येतील. मोहरम सणानिमित्ताने मिरवणूक मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती करुन घेण्यात यावी. तसेच मार्गावर आवश्यक तो विद्युत व्यवस्था करण्यात यावी. मोबाईल शौचालय, पिण्याचे पाणी यासह आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी सालीमठ यांनी यावेळी दिले.

जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला म्हणाले की, मोहरम सण कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून शांततामय वातावरणात साजरा करण्यात यावा. मिरवणुकीदरम्यान डिजेचा वापर करण्यात येतो. ध्वनीप्रदुषणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. मर्यादेपेक्षा अधिक डिजेचा आवाज होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. मिरवणुकीमध्ये डिजे ऐवजी पारंपारिक वाद्यांचा वापर करण्यात यावा. तसेच मिरवणुकीसाठी ठरवून दिलेल्या मार्गानेच मिरवणुक काढण्यात यावी. यामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल होणार नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य व उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनीही उपयुक्त अशा सुचना केल्या.

अ.नगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असो.च्या

अध्यक्षपदी सत्येन मुंदडा तर उपाध्यक्षपदी शिवाजी व्यवहारे



नगर – अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी कोपरगांव पिपल्स बँकेचे सत्येन मुंदडा तर उपाध्यक्षपदी पारनेर तालुका सैनिक बँकेचे शिवाजी व्यवहारे यांची निवड झाली आहे. बँकेच्या झालेल्या असोसिएशनच्या सभेत ही निवड झाली. मावळते अध्यक्ष सीए गिरिष वैसास यांनी सत्येन मुंदडा यांचे नुतन अध्यक्ष पदासाठी नाव सुचविले तर सीए वसंत गुंड यांनी उपाध्यक्ष पदासाठी शिवाजी व्यवहारे यांचे नाव सुचविले. सर्व संचालकांच्या एकमताने अध्यक्षपदी सत्येन मुंदडा तर उपाध्यक्षपदी शिवाजी व्यवहारे यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी निवडणुक अधिकारी म्हणून बी.बी.सिनारे उपस्थित होते.

नूतन अध्यक्ष सत्येन मुंदडा हे कोपरगांव येथील कोपरगांव पिपल्स बँकेचे माजी चेअरमन असून, कोपरगांव नगरपालिकेचे नगरसेवक, लायन्स इंटरनॅशनलचे माजी जिल्हाध्यक्ष आहेत. नूतन उपाध्यक्ष शिवाजी व्यवहारे हे पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेचे विद्यमान चेअरमन आहेत.

नूतन अध्यक्ष सत्येन मुंदडा यांनी बँक्स असोसिएशनच्या माध्यमातून संचालक, अधिकारी व कर्मचारी यांना विविध विषयावर प्रशिक्षणातून प्रगत करण्याचा प्रयत्न आहे. बँकेच्या समोर असणारी नवनवीन आव्हाने, तसेच ग्राहकांमिमुखू सेवा देण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन सत्रे, कॉन्फरन्स घेण्याचा मानस व्यक्त केला.नूतन अध्यक्ष सत्येन मुंदडा व नूतन उपाध्यक्ष शिवाजी व्यवहारे यांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी अहमदनगर जिल्ह्यातून जिल्हा बँक्स असोसिएशनचे संचालक उपस्थित होते.

सलग तीन वर्ष सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा विक्रम कौतुकास्पद

दादाभाऊ कळमकर यांचे प्रतिपादन

प्रज्ञाशोध परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी आमदार दादाभाऊ कळमकर, नवनाथ बोडखे, ज्ञानदेव पांडूळे, अभिषेक कळमकर, अर्जुन पोकळे, श्याम व्यवहारे, कैलास गुंजाळ आदींसह शिक्षक वर्ग.

नगर – शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या एकत्रित कष्टाने स्पर्धा परीक्षेत मुले चमकत आहे. विद्यालयाने सलग तीन वर्ष जिल्ह्यात सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा केलेला विक्रम संस्थेच्या दृष्टीने कौतुकास्पद आहे. शिक्षण क्षेत्रात असलेले सातत्य व कष्टातून गुणवत्ता निर्माण होणार असल्याचे दादाभाऊ कळमकर यांनी सांगितले.

शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाचे ९९ विद्यार्थी राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत चमकले असून, त्यांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी येण्याचा बहुमान शाळेने पटकाविला असून, ६ विद्यार्थी राज्याच्या तर २० विद्यार्थांनी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. तर शहराच्या गुणवत्ता यादीत ७३ विद्यार्थी चमकले आहे.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना फेटे बांधून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नवनाथ बोडखे, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडूळे, जनरल बॉडी सदस्य अभिषेक कळमकर, अर्जुन पोकळे, श्याम व्यवहारे, कैलास गुंजाळ, जयद्रथ खाकाळ, अंबादास गारुडकर, तुषार साठे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव लंके, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे आदींसह शालेय शिक्षक व पालक उपस्थित होते.

अभिषेक कळमकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अवांतर वाचनावर विद्यार्थ्यांनी भर द्यावा. वाचनाने मन एकाग्र व बुध्दी प्रगल्भ होते. वाचन व एकाग्रतेने केलेला अभ्यास शिक्षणात गुणवत्ता निर्माण करत असल्याचे सांगून, त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे आवाहन केले. ज्ञानदेव पांडूळे यांनी या शाळेत सर्वसामान्यांची मुले शिक्षण घेत असून, त्यांनी मिळवलेले यश अभिमानास्पद असल्याचे सांगितले.

मंथन प्रज्ञाशोध परीक्षेच्या राज्य गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक- मार्गी संतोष ठाणगे (इयत्ता पहिली), राज्यात दुसरा क्रमांक- विनय नाबगे, प्रथमेश होले, सरफराज शेख (सर्व. इयत्ता दुसरी), राज्यात पाचवा क्रमांक- संस्कृती कापरे (इयत्ता दुसरी) यांनी मिळवला आहे. तर जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत इयत्ता पहिली- रुद्र गुंजाळ, श्रीराज गुंजाळ, आराध्या जाधव, वरद नाबगे, इयत्ता दुसरी- आरोही सोनवणे, सिध्दवेदाव पेंडमाळे, आदिराज दराडे, आस्था सुंबे, अनुष्का धामणे, पार्थ जाधव, स्वरा दरेकर, वेदांत राहिंज, विराज काठमोरे, अर्श शेख, आयुष सोनमाळी, राजनंदिनी गांगर्डे, इयत्ता तिसरी- किर्ती शिरसे, अर्णव बोरुडे, इयत्ता चौथी- ईशान पालवे, रिओ शेख यांच्यासह शहराच्या गुणवत्ता यादीत चमकलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

मंथन प्रज्ञाशोध परीक्षेतील लक्ष्मीबाई भाऊराव पाटीलच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

या विद्यार्थ्यांना उर्मिला साळुंखे, मीनाक्षी खोडदे, सुजाता दोमल, शितल रोहोलकर, जयश्री खांदोडे, शिल्पा कानडे, सोनाली अनभूले, रूपाली वाबळे यांनी मार्गदर्शन केले.

'माझी लाडकी बहीण योजने'साठी अहमदनगर जिल्ह्यात विशेष मोहीम

नगर – अहमदनगर जिल्ह्यात महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य आणि आरोग्य सुधारण्यासाठी मुख्यमंत्री–माझी लाडकी बहिण योजनेची दोन दिवसीय विशेष मोहिम आयोजित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी या मोहिमेच्या आयोजनाच्या सूचना दिल्या आहेत.

ही मोहिम १२ आणि १३ जुलै रोजी आयोजित केली जाईल, ज्यामध्ये ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना ऑनलाईन आणि ऑफलाईन अर्ज भरण्याची संधी दिली जाईल. ग्रामपंचायत, वाडी, वस्ती आणि वॉर्ड स्तरावर योजनेचा प्रचार केला जाईल. शिबिर स्थळी पिण्याचे पाणी, प्राथमिक आरोग्य सेवा आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध असतील.

विशेष मोहिमेत सहभागी होण्यासाठी ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, मदतनीस, सेतु केंद्र कर्मचारी आणि नगरपालिकेचे कर्मचारी यांची पथके तयार केली जातील. शिबिरांमध्ये जास्तीत जास्त अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

महानगरपालिका, गटविकास अधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी आणि नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांना शिबीर आयोजनाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विविध शिबिरांना भेट देतील. योजनेचा लाभ अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मोहिमेचा अहवाल १५ जुलै रोजी सादर करायचा आहे. अशा सूचना ही जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या आहेत.

''मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण'' योजनेचे अर्ज सर्व प्रभाग समितीत विविध ठिकाणी स्वीकारले जाणार

नगर – महाराष्ट्र राज्यात ''मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण'' योजना सुरू करण्यास महिला व बाल विकास विभागाकडील २८ जून रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेच्या अनुषंगाने पात्र महिलांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा व ऑफलाईन अर्ज मिळणे सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. सदर विशेष मोहिम १२ व १३ जुलै अखेर राबविण्यात येणार आहे. सदर योजनेचे कामकाज यानंतरही खालील ठिकाणी चालू राहील.

प्रभाग समिती कार्यालयाचे नांव		अर्ज स्वीकृतीचे ठिकाण
प्रभाग समिती क्र. १, (सावेडी)	०१.	भुतकरवाडी शाळा
शाम गोडळकर, प्रभाग अधिकारी, प्र.स.क्र. १ मो.नं.८७८८२१३२७०	०२.	मनपा शाळा क्र.१७, प्रभात बेकरी समोर
	०३.	प्रभाग समिती कार्यालय क्र. १
	०४.	नागापूर उप कार्यालय
प्रभाग समिती क्र. २ (शहर)	०१.	प्रभाग समिती कार्यालय क्र. २
राकेश कोतकर, प्रभाग अधिकारी, प्र.स.क्र. २ मो.नं. ९२८४५४२०३६	०२.	माहिती सुविधा केंद्र
	०३.	महात्मा फुले दवाखाना
	०४.	तोफखाना दवाखाना
	०५.	CLC केंद्र
प्रभाग समिती क्र. ३ (झेंडिगेट)	०१.	प्रभाग समिती कार्यालय क्र. ३
अशोक साबळे, प्रभाग अधिकारी, प्र.स.क्र. ३ मो.नं. ९९५६९००४५५	०२.	आरोग्य केंद्र – झेंडीगेट
	०३.	आरोग्य केंद्र – मुकुंदनगर
प्रभाग समिती क्र.४ (बुरुडगाव)	०१.	प्रभाग समिती कार्यालय क्र.४
नानासाहेब गोसावी, प्रभाग अधिकारी, प्र.स.क्र. ४ मो.नं. ९९२२४३९५५१	०२.	केडगाव उप कार्यालय
	०३.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, मनपा शाळा क्र. ४, रेल्वे स्टेशन समोर
	०४.	मनपा शाळा, ओंकारनगर

तरी वरील ठिकाणी पात्र महिलांना अर्ज भरता येतील, लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे महानगरपालिकेने आवाहन केले आहे.

श्री मार्कंडेय विद्यालयातील शिक्षकांच्या उपोषणाच्या चौकशीचे आदेश

नगर– येथील गांधी मैदान या भागातील श्री मार्कंडेय मंदिराचा भुमीपूजन सोहळा व जिर्णोध्दार विरोधात संस्थेचे स्वयंघोषीत संचालकांबरोबर शाळेचे मुख्याध्यापक संदिप छिंदम, शशिकांत गोरे, विद्या दगडे, श्रीनिवास मुत्याल, सुहास बोडखे, किशोर कोटा व शिक्षणसेवक अनंत गाली यांनी ८ मे रोजी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद यांची कुठलीही परवानगी न घेता जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपोषण केले. तथापी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे सरकारी नोकर असल्यामुळे त्यांनी सार्वजनिक हिताच्या कामाविरुध्द कारवाई करु नये असे असतांना देखील श्री मार्कंडेय विद्यालय प्राथमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अनाधिकाराने व बेकायदेशीर उपोषण केले.

सदरचे कृत्य हे महाराष्ट्र राज्य नागरी सेवा यांचे विरुध्द आहे. यामुळे संजय वल्लाकट्टी यांनी ३ जून रोजी शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद यांचेकडे लेखी तक्रार केली. या तक्रारीमध्ये असे नमुद केले की, सदरचा संप (उपोषण) बेकायदेशीर ठरविण्यात यावा. सदरील कर्मचारी हे १०० टक्के अनुदानावर कार्यरत असल्यामुळे त्यांच्या विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) सन १९७९ अन्वये कार्यवाही करण्यात यावी. त्यांनी कर्तव्यात कसुर केल्यामुळे त्यांना पदावरुन बरखास्त करण्यात यावे, त्यांचे निलंबन करण्यात यावे. तसेच त्यांच्या सर्व्हीस पुस्तीकेमध्ये तशी नोंद घेण्यात यावी.

सदर घटनेची विभागीय चौकशी करण्यात यावी. त्याप्रमाणे शिक्षणाधिकारी प्राथमिक विभाग जिल्हा परिषद यांनी तात्काळ प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ महानगरपालिका यांना समक्ष चौकशी करुन अहवाल सादर करण्यास सांगितले व तसा आदेश ९ जुलै रोजी पारीत करुन शिक्षण मंडळ महानगरपालिका यांना पाठविण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे सदर विद्यालयाच्या शिक्षकांची चौकशी चालू आहे.

केडगावमधील बास्केटबॉल स्पर्धेत एबीसी वाडियापार्क संघ व एसबीसी सावेडी संघ विजयी

नगर – केडगाव स्पोर्ट्स् अकॅडमी तर्फे केडगाव देवी मंदिर परिसरात घेण्यात आलेल्या मुलींच्या बास्केटबॉल स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात एबीसी वाडियापार्क संघ व १७ वर्षा खालील गटात एसबीसी सावेडी संघाने विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेत शहरातील व उपनगरातील १२ मुलींचे संघ सहभागी झाले होते. उद्योजक सचिन कोतकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.

केडगाव स्पोर्ट्स् अॅकॅडमीतर्फे केडगाव देवी मंदिर परिसरात घेण्यात आलेल्या मुलींच्या बास्केटबॉल स्पर्धेत १२ व १७ वर्षांखालील गटातील विजयी संघ. समवेत उद्योजक सचिन कोतकर, मनोज कोतकर, छब्बुराव कोतकर आदी.

वैशालीताई कोतकर, मनपा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, केडगाव स्पोर्ट्स् अॅकॅडमीचे छबुराव कोतकर, जालिंदर कोतकर, मुख्याध्यपिका वासंती धुमाळ, प्रशिक्षक सत्यम देवळालीकर, ओमसिंग बायस, राष्ट्रीय खेळाडू सचिन अग्रवाल, विजय सर, भापकर, अक्षय कर्डीले, हर्षल शेलोत, प्रथमेश काशीद आदींसह खेळाडू, प्रशिक्षक व पालक उपस्थित होते.

वैशालीताई कोतकर म्हणाल्या की, मुलीचा शारीरिक विकास होण्यासाठी मैदानी खेळ महत्त्वाचा आहे. शारीरिकदृष्ट्य सक्षम होण्यासाठी मुलींनी एकतरी मैदानी खेळ खेळावा. खेळातून पुढे आलेल्या खेळाडूंना शासनाकडून नोकरीमध्ये देखील प्राधान्य दिले जात आहे. प्रथमच केडगावमध्ये झालेल्या मुलींच्या बास्केटबॉल स्पर्धेमुळे खेळाला चालना मिळणार आहे. मुलींमध्ये खेळाची आवड निर्माण होण्यासाठी घेण्यात आलेली स्पर्धा कौतुकास्पद असल्याचे त्या म्हणाल्या.

मनोज कोतकर यांनी मुलांना शिक्षणाबरोबर खेळही आयुष्यात महत्त्वाचा आहे. खेळाने मुलांमध्ये खेळाडूवृत्ती वृध्दींगत होत असते. यामुळे मुलांना यश–अपयश पचविण्याची शक्ती निर्माण होत असल्याचे सांगितले.

या स्पर्धेत एसबीसी सावेडी, एबीसी वाडिया पार्क, बॉलर्स सारडा विद्यालय, ओयासिस इंग्लिश मिडीयम स्कूल, महाराणी ताराबाई कन्या विद्यालय, केडगाव स्पोर्ट्स् अॅकेडमी आदी संघाचा समावेश होता. स्पर्धेचे पंच म्हणून व्हिक्टर, नशरा, स्तवन यांनी काम पाहिले.

संदीप उद्योग समूहाच्या वतीने विजेत्या संघांना बक्षीस देण्यात आले. दोन्ही गटातून उत्कृष्ट खेळाडू म्हणून श्रेया बायस व श्रुती सुरसे या मुलींची निवड करण्यात आली. खेळाडूंना मनोज कोतकर यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. १० वी बोर्डाच्या परीक्षेत चांगले गुण मिळाल्याबद्दल अॅकेडमीची माजी खेळाडू नक्षत्रा ढोरसकर, पूर्वा ढोरसकर, ज्ञानेश्वरी पालवे, हार्दिक कोतकर व यश राऊत यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे नियोजन संदीप कोतकर मित्र परिवार व स्वाती बारहाते यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रसाद जमदाडे यांनी केले. आभार रोहिणी कोतकर यांनी मानले.

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार अहमदनगर यांचे कार्यालय, अहमदनगर

ई–मेल अॅड्रेस:– nagartahsildar@gmail.com
दूरध्वनी क्रमांक:– ०२४१–२४११६००
क्र. कावि/ Mag–२/२१४/२०२४ अहमदनगर दि. २८/०६/२०२४

जाहीर नोटीस

श्री. सोमनाथ एकनाथ तोडमल
तोडमलवाडी, जेऊर, ता. जि. अहमदनगर } वादी
विरूद्ध
ग्रामसेवक, निबंधक जन्म/मृत्यू
ग्रामपंचायत जेऊर, ता. जि. अहमदनगर } प्रतिवादी

ज्याअर्थी अर्जदार यांनी सदरचा अर्ज जन्म नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा. तहसीलदार अहमदनगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार श्री. सोमनाथ एकनाथ तोडमल यांचे आजी नामे सईबाई काशिनाथ तोडमल यांची दि. १४/११/२०२० रोजी जन्म/मृत्यू झालेला आहे. त्यांचे जन्म/मृत्यूची नोंद प्रतिवादी यांच्याकडे होऊन तसा जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार सोमनाथ एकनाथ तोडमल यांची आजी नामे सईबाई काशिनाथ तोडमल यांचा जन्म/मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुराव्यानिशी मा. तहसीलदार अहमदनगर यांचे कार्यालयात कळवाव्यात मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार यांचे अर्जाच्या अनुषंगाने नामे सईबाई काशिनाथ तोडमल यांचे जन्म/मृत्यूची नोंद प्रतिवादी यांच्याकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. मग त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.

येणेप्रमाणे आज दि. २८/०६/२०२४ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

तहसीलदार अहमदनगर करिता

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, संगमनेर

दुरध्वनी क्रं. ०२४२५–२२५३९३
email id ee.mjpsngr@gmail.com

ई– निविदा सुचना क्रं. ४ सन २०२३ – २४ (द्वितीय मागणी)

जल जीवन मिशन अंतर्गत चंदनापुरी व इतर २ गावे प्रादे. पाणी पुरवठा योजना, ता. संगमनेर, जि. अहमदनगर या कामाची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, संगमनेरकडुन मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रु. २,३६,०८,०३८/– आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशिल दि. १२/०७/२०२४ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टल वर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

निविदा प्रक्रियाकार्यक्रमाचा सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग, संगमनेर

धनादेश अनादर प्रकरणी आरोपीने फिर्यादीस रक्कम अदा केली

नगर – फिर्यादी सौ.पालवे यांचा घरगुती खानावळीचा व्यवसाय होता. त्यांच्या खानावळीत भोजन करण्यासाठी आरोपी हा ग्राहक म्हणून सतत येत असे व त्या दरम्यान यांची ओळख होवून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. आरोपी यांस घरगुती अडचणीसाठी आर्थिक मदत भासली तेव्हा आरोपीने उसनवार म्हणून फिर्यादी यांच्याकडून रोख रक्कम उसनवार म्हणून घेतली व रक्कम परत करण्याऐवजी आरोपीने त्याच्या एचडीएफसी बँकचा धनादेश दिला.

हा धनादेश न वटता परत आला म्हणून फिर्यादी यांनी अ.नगर येथील जिल्हा न्यायालयात अॅड. सचिन देवा पाठक यांच्या मार्फत फिर्याद दाखल केली. या केस मध्ये आरोपी राहात्या पत्त्यावर आढळून येत नव्हता. तेव्हा सर्वप्रथमच सोशल मिडियाचा वापर करून आरोपीस व्हॉटसअपवर समन्सची बजावणी करून मे.न्यायालयात हजर राहण्याचा आदेश मिळवला. आदेशान्वये केसमध्ये आरोपी हजर झाला. तसेच केसमध्ये आरोपीने फिर्यादीस सदरची उसनवार घेतलेली रक्कम अदा केली. सदर केसचा निकाल अवघ्या ७ महिन्यात लावण्यात अॅड. सचिन देवा पाठक यांना यश आले व फिर्यादीस तिची रक्कम मिळवून दिली. तसेच केसमध्ये फिर्यादीने सुरुवातीला भरलेले स्टॅम्पची रक्कम पैसे परत मिळणेकामी सदर प्रकरण २७–७–२४ रोजीच्या आयोजित राष्ट्रीय लोक न्यायालयात ठेवण्यात आले आहे.

आरोपीतर्फे अॅड. संदिप बुरके पा. यांनी कामकाज पाहिले.

जाहीर निविदांतर्गत खुली निविदा सूचना

ग्रामपंचायत दादेगाव. ता. शेवगाव जि. अहमदनगर यांचे कडून जिल्हा परिषद नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या मार्फत दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या निविदा मागवत आहे. (योजना – १५ वित्त आयोग)

अ. नं.	कामाचे नाव	निविदा रक्कम	निविदा संचाची रक्कम	बयाना रक्कम	कामाची मुदत	अधिकृत ठेकेदार वर्ग
१	दारकुंडे वस्ती जि.प शाळा कंपाऊंड करणे.	९५,७८०/–	२३६/–	१%	६ महिने	सु. बे
२	जि.प.शाळा जुने दादेगाव संरक्षक भिंत बांधणे	७१,१३५/–	२३६/–	१%	६ महिने	सु. बे
३	जि.प.शाळा जुने दादेगाव संरक्षक भिंत बांधणे	८७,९५०/–	२३६/–	१%	६ महिने	खुला
४	अनुसूचित जातीच्या वस्तीत RO फिल्टर समोर पेव्हर ब्लोक बसवणे.	७२,०००/–	२३६/–	१%	६ महिने	सु. बे
५	पाणी पुरवठा करणे व बोअरवेलमध्ये विद्युत पंप बसवणे.	४०,६०५/–	२३६/–	१%	६ महिने	सु. बे
६	पाणी पुरवठा करणे.	७५,०००/–	२३६/–	१%	६ महिने	खुला

(१) निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून कोऱ्या निविदा संच दि. १२/०७/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून दि. १९/०७/२०२४ सायं. १७.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) निविदा दर टाकून सिलबंद लिफाफ्यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयात सादर करता येतील. (२) निविदा संदर्भात सविस्तर माहिती अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. तसेच ब–१ निविदा संच फॉर्म ग्रा.पं. मध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे. (३) निविदा १२/०७/२०२४ रोजी सकाळी १०:०० ग्रा.पं. दादेगाव येथे उघडण्यात येतील. (४) निविदा अटी व शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे. (५) निविदे सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्र जोडावे. (६) जि.प. अधिकृत ठेकेदार सुबे अभियंता नोंदणी प्रमाणपत्रावर बयाना रक्कम भरण्यास असेल त्यांना बयाना भरण्यास सवलत देण्यात येईल.

सही
ग्रामसेवक ग्रा. पं. दादेगाव
ता. शेवगाव जि. अहमदनगर

सही
सरपंच ग्रा.पं. दादेगाव
ता. शेवगाव जि. अहमदनगर

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अहमदनगर यांचे कार्यालय,

पत्ता– सिंचन भवन, दुसरा मजला, फकीरवाडा, नगर– औरंगाबाद रोड, अहमदनगर– ४१४००१
ई–मेल पत्ता: cemd.amdngrwrd@maharashtra.gov.in दूरध्वनी क्रमांक– ०२४१ – २३२५५८०

ई– निविदा सूचना क्र. ०५ सन २०२४–२५

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अहमदनगर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई– निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अहमदनगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

कामाचे नाव	उप अभियंता, यांत्रिकी उपविभाग, संगमनेर या उपविभागाकडील संयंत्रे / वाहनांच्या परिचलनासाठी जडयंत्रचालक, वाहनचालक व मदतनीस यांची सेवा (१ वर्ष) बाहय अभिकरणामार्फत घेणे
जिल्हा	अहमदनगर
निविदेची अंदाजित किंमत रुपये	रु.२५.८२.३२०/–
ई– निविदा उपलब्ध कालावधी	दिनांक. १२/०७/२०२४ ते दिनांक. २६/०७/२०२४
ई– निविदा उघडणे.	दिनांक. २९/०७/२०२४

जा.क्र.यांविअ / लेखा / निविदा / ९९० / २०२४
दि. ०९/०७/२०२४
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अहमदनगर यांचे कार्यालय.
जिमाका/नगर/जाहि/०१७ /२०२४– २५

कार्यकारी अभियंता
यांत्रिकी विभाग,
अहमदनगर

जाहीर नोटीस

तमाम लोकांस आमचे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **श्री. अभिषेक सुधीर वखारे** यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीच्या खरेदी बाबत आमच्या अशिला बरोबर खरेदी विक्रीचा व्यवहार ठरला असून त्यानुसार आमचे अशिल यांची विद्यमान मालकास विसारापोटी रक्कम दिलेली आहे. विद्यमान मालक यांचे नावाची नोंद सदर मिळकतीच्या रेकॉर्डला झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी असून इतर कोणत्याही पतसंस्था अगर बँकेचा अगर पतपीढीचा बोजा नाही, तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्या बाबतचा खात्री व भरवसा दिला आहे. तथापी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी अथवा लेखी करार, खरेदीखत साठेखत, लिज, इजमेंट, मनाई हुकुम, बक्षिस, वारस हक्क, अॅटॅचमेंट, खाजगी अथवा सरकारी निमसरकारी बोजा असल्यास, कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास त्यांनी त्यांच्या हक्काबाबत ही नोटीस प्रसिध्द होताच १५ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास सदर मिळकती वर अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरुन व सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी आहे असे ग्राहयधरुन आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

डि. अहमदनगर सब. डि. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **भिस्तबाग** येथील मे. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील प्लॉट व त्यावरील बांधकामासह रो बंगलो मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे–

सर्व्हे नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्रफळ
३४/३	३ व ४ व ५/४	६२.७० चौ.मी.

हा संपुर्ण प्लॉट व यावर मंजुर प्लॅनप्रमाणे आर.सी.सी. पध्दतीचे बांधकाम झालेले असून यांचे ग्राऊंड फ्लोअरवरील बांधकाम क्षेत्र – ३४.९४ चौ.मी. व फर्स्ट फ्लोअरवरील बांधकाम क्षेत्र ३२.२७ चौ.मी. असे एकुण बांधकाम क्षेत्र ६७.२१ चौ. मी. असून अशी रो–बंगलो मिळकत –

यासी चतु:सिमा खालील प्रमाणे –
पूर्वेस : सर्व्हे नं. ३४ पैकी — दक्षिणेस : रो बंगलो नं. ३/४/५/५
पश्चिमेस : ९.०० मीटर रस्ता — उत्तरेस : रो बंगलो नं. ३/४/५/३

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत तदंगभुत वस्तूसह व वहिवाटीच्या हक्कांसह काहीएक राखुन न ठेवीता असे.

तारीख– १२.०७.२०२४
अहमदनगर.

अॅड. फिरोज कम्मु शेख
ऑफिस– प्लॉट नं. १८, अमर कॉम्प्लेक्स,
दगडी चाळ जवळ, मुकुंदनगर, अहमदनगर
मो.नं. ९८२२६३०४५६, ७०२०२०१२१३

ग्रामपंचायत गुणवडी ता. नगर जि. अहमदनगर.
जाहीर निविदा सूचना.

ग्रामपंचायत गुणवडी ता. नगर जि. अहमदनगर याजकडून या नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि ग्रामपंचायतीच्या खालील विकास कामासाठी जि. प. कडील नोंदणीकृत योग्य त्या कंत्राटदारा कडून खालील कामाची बी १ निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	बयाना रक्कम	कोऱ्या निविदा संचाची किंमत	अधिकृत ठेकेदार	कामाची मुदत
१	१५ वा वित्त अंतर्गत मौजे गुणवडी ता.नगर जि. अहमदनगर येथे जि.प.शाळा पेव्हिंग ब्लॉक बसविणे	१,००,९३३/–	१००९/–	२३६/–	खुला	३ महिने
२	१५ वा वित्त अंतर्गत मौजे गुणवडी ता.नगर जि.अहमदनगर येथे स्मशानभूमी येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे	३,०६,९८४/–	३०७०/–	५९०/	खुला	३ महिने
३	१५ वा वित्त अंतर्गत मौजे गुणवडी ता. नगर जि.अहमदनगर येथे इंदिरानगर अंगणवाडीस तार कंपाउंड करणे	७७,०३२/–	७७०/–	२३६/–	खुला	३ महिने
४	१५ वा वित्त अंतर्गत मौजे गुणवडी ता.नगर जि. अहमदनगर येथे गावठाण अंगणवाडी व वाघवाडी अंगणवाडीस तार कंपाउंड करणे	१,४८,११७/–	१४८१/–	२३६/–	खुला	३ महिने
५	अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे अंतर्गत मौजे गुणवडी ता.नगर जि.अहमदनगर येथे इंदिरानगर येथे स्ट्रीट लाईट वीजपुरवठा करणे.	३,३८,९१२/–	००/–	५९०/–	सु.बे.	३ महिने
६	१५ वा वित्त अंतर्गत मौजे गुणवडी ता.नगर जि. अहमदनगर येथे इंदिरानगर अंगणवाडीस शौचालय बांधकाम करणे	५६,७०५/–	००/–	२३६/–	सु.बे.	३ महिने
७	१५ वा वित्त अंतर्गत मौजे गुणवडी ता.नगर जि.अहमदनगर येथे इंदिरानगर अंगणवाडीस फरशी बसविणे व रंग देणे	४१,१३४/–	४११/–	२३६/–	मजूर संस्था	३ महिने
८	१५ वा वित्त अंतर्गत मौजे गुणवडी ता.नगर जि.अहमदनगर येथे इंदिरानगर अंगणवाडीस तार कंपाउंड करणे	४१,२०९/–	४१२/–	२३६/–	मजूर संस्था	३ महिने

नियम व अटी :– १) वरीलप्रमाणे दि. १२/०७/२०२४ ते १८/०७/२०२४ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायं १७.०० वा. पर्यंत निविदा विक्री व स्वीकारली जाईल. २) दिनांक. १८/०७/२०२४ सायं. १७.०० वाजेनंतर आलेल्या निविदा ग्राह्य धरल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. ३) निविदा जि. प. कडे नोंदणी केलेल्या योग्य त्या ठेकेदारानीच दाखल कराव्यात,अन्य कंत्राटदारांनी दाखल केलेल्या निविदा ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. ४) कामा संदर्भात सर्व अटी व शर्ती अंदाजपत्रक ग्रा. प. कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. ५) कामाची देयके मोजमाप पुस्तिकेनुसार व उपलब्ध अनुदानानुसार अदा केली जातील. ६) निविदेसोबत १. नोंदणी प्रमाणपत्र. २. GST प्रमाणपत्र.३.पॅनकार्ड ४. आधारकार्ड ५.१००/– रु. बॉंडपेपर वर निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असलेबाबत प्रमाणपत्र जोडावेत.६) ६) बी. १ फॉर्म वर प्रत्येक पानावर सही आवश्यक ७) ठेकेदाराने दर निविदा संचासोबत दिलेल्या BOQ मधेच सादर करावेत. ८) निविदा दिनांक १९/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रा.प.कार्यालयात उघडण्यात येतील. ०९) वरीलप्रमाणे अटी व शर्ती मान्य असणाऱ्या कंत्राटदारांनी निविदा सादर कराव्यात.अपूर्ण निविदा कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करता येतील. १०) एखादी किंवा पूर्ण निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे.
शिक्का.

स्वाक्षरीत .
सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत गुणवडी.
ता. नगर, जि. अहमदनगर.

जाहीर ब–१ निविदा नोटीस

ग्रामपंचायत मौजे शेलविहीरे, ता. अकोले, जि. अहमदनगर यांच्याकडून जाहिर निविदा नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ग्रामपंचायत मौजे शेलविहीरे, ता. अकोले, अंतर्गत खालील काम करण्यासाठी सिलबंद लिफाफ्यात ब–१ निविदा मागवण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	बयाणा रक्कम	निविदा फी	वर्ग	लेखाशीर्ष	कालावधी
१	मौजे शेलविहीरे ता.अकोले येथे जि.प. शाळा दुरुस्ती व घोटाई करणे.	८८४४९/–	१%	२३६/–	सु. बे.	पेसा सन २०२१–२२	६ महिने
२	मौजे शेलविहीरे ता.अकोले येथे गटार बांधकाम व शोषखड्डा करणे.	२१९९४०/–	१%	२३६/–	सु. बे.	१५ वा वित्त आयोग सन २०२२–२३	६ महिने
३	मौजे शेलविहीरे ता.अकोले येथे पाईपलाईन दुरुस्ती व व्हॉल्वचेंबर बांधकामकरणे.	८४७४६/–	१%	२३६/–	सु. बे.	१५ वा वित्त आयोग सन २०२०–२१	६ महिने
४	मौजे शेलविहीरे ता.अकोले येथे जि.प. शौचालय दुरुस्ती करणे.	८३२८८/–	१%	२३६/–	सु. बे.	१५ वा वित्त आयोग सन २०२०–२१ व २०२१–२२	६ महिने
५	मौजे शेलविहीरे ता.अकोले येथे गटार बांधकाम करणे.	६६०५८/–	१%	२३६/–	सु. बे.	१५ वा वित्त आयोग सन २०२१–२२	६ महिने
६	मौजे शेलविहीरे ता.अकोले येथे जि.प. शाळा दोन खोल्या दुरुस्ती करणे.	४१५२१४/–	१%	२३६/–	सु. बे.	पेसा सन २०२०–२१ व २०२१–२२	६ महिने

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटी याबाबतची माहिती ग्रां.पं. कार्यालयात दि. १२/०७/२०२४ ते १९/०७/२०२४ या कालावधीत कार्यालयात वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सिलबंद निविदा दि. १९/०७/२०२४ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा शक्यतो २२/०७/२०२४ रोजी सकाळी ११ वा. उघडण्यात येतील. निविदा मंजूर–नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायत मौजे शेलविहीरे, ता. अकोले ने राखून ठेवला आहे. आवश्यक प्रमाणपत्र :– १) जि.प. नोंदणी प्रमाणपत्र, २) पॅनकार्ड. ३) जी.एस.टी. प्रमाणपत्र, ४) आधारकार्ड.

ग्रामविकास अधिकारी/सरपंच
ग्रा.पं.मौजे शेलविहीरे, ता. अकोले, जि. अहमदनगर

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिल – वैशाली रितेश भाटिया व रितेश ओमप्रकाश भाटिया यांचेबरोबर ठरलेला आहे सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १२/०७/२०२४

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

मिळकत वर्णन: जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका हद्दीतील, टीपी स्कीम नंबर ४ मधील** खालील वर्णनाची मिळकत–

फायनल प्लॉट नंबर	म्यु क नंबर	क्षेत्रफळ
२०९ ब/ ४४२	९३+९४	१११.१ चौ.मी.

ही संपुर्ण जागा व त्यावरील असलेले सिमेंट कॉंक्रीटमधील तळघराचे बांधकाम क्षेत्र ७ . १४ चौ मी, तळमजल्याचे बांधकाम क्षेत्र २८.६६ चौ मी + पत्रा बांधकामा क्षेत्र ४७.९९ चौ मी व पहिल्या मजल्याचे बांधकाम क्षेत्र २८.५५ चौ मी असे एकुण बांधकाम क्षेत्र ११२.३४ चौ मी, लाईट मीटर व नळ कनेक्शनसह आहे त्या स्थितीत संपुर्ण मिळकत.

यांसी चतु:सीमा –
पुर्वेस – खोली नंबर ९२ — दक्षिणेस – रस्ता
पश्चिमेस – खोली नंबर ९ — उत्तरेस – रस्ता

विद्यमान मालकांचे नाव–
१.मंजु घनश्यामदास बठेजा
रा. घर नंबर ९३/९४, तारकपुर, अहमदनगर
२. श्री. प्रकाश घनश्यामदास बठेजा
३. श्री. लख्मीचंद घनश्यामदास बठेजा
२व ३ रा. २२, मिस्कीन मळा, पारगांवकर हॉस्पीटल जवळ, सावेडी, अहमदनगर.

अॅड.आर.टी.शर्मा
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स,
दाळमंडई, अहमदनगर

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

विज्ञानवार्ता

पृथ्वीच्या पाठीवर अनेक गूढ अशी ठिकाणे आहेत. त्या ठिकाणी अतिशय प्रतिकूल आणि विचित्र परिस्थिती असते. असे असले तरी माणसाला मात्र तेथील परिस्थिती विषयी कायम कुतूहल वाटत राहिलेले असते आणि त्यामुळेच त्या ठिकाणी जाण्याचा प्रयत्न अनेकांनी केलेला असतो.पृथ्वीवरील अशा अनेक गूढ ठिकाणी जाण्यास आता प्रतिबंध करण्यात आलेला आहे. विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण असे एक ठिकाण भारतातही आहे.

पृथ्वीवरील प्रतिबंधित स्थळांचे गूढ

१) स्नेक आयलँड (ब्राझील) ह ब्राझील मधील हे छोटेसे बेट सापांचा अधिवास म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी अतिशय विषारी सापांचा मोठ्या प्रमाणावर वावर आहे. अगदी सोनेरी रंगाचे ठोके असणारे वायपर या जातीचे विषारी साप या ठिकाणी आढळतात. त्यामुळे या बेटावर कुणालाही जाण्यास ब्राझील सरकारने बंदी घातली आहे. त्यामागे माणसाच्या जीवाची सुरक्षितता याचबरोबर दुर्मिळ प्राण्यांचे रक्षण करणे असा दुहेरी हेतू आहे.

२) चेर्नोबिल अणुभट्टी परिसर १९८६ मध्ये



चेर्नोबिल येथील अणुभट्टीत दुर्घटना होऊन किरणोत्सर्जन झाले होते. त्यामुळे त्याठिकाणी काम करणाऱ्यांपैकी ४० जणांना प्राण गमवावे लागले तर अनेक जण जायबंदी झाले. या दुर्घटनेतील काहीजणांचा नंतरही मृत्यू झाला. त्यामुळे आता या ठिकाणी कुणालाही जाऊ दिले जात नाही. आजही येथील हवा आणि पाणी अतिशय दूषित आणि विषारी स्वरूपाचे आहे.

अर्थात अभ्यासक आणि संशोधकांना पूर्ण काळजी घेऊनच आणि सुरक्षितपणे याचे जाणेयेणे या ठिकाणी जाण्यास परवानगी दिली जाते.

३) स्वालबार्ड ग्लोबल सीड वॉल्ट ह नॉर्वेतील आर्टिक समुद्र परिसरात हे ठिकाण आहे. पृथ्वीवर कोणतीही दुर्घटना झाली आणि बी बियाणे आणि निसर्गातील झाडे वनसंपदा नष्ट झाली तर पुन्हा त्यांची निर्मिती करता यावी यासाठी या ठिकाणी बियाणे जपून ठेवण्यात आलेले आहे. जेणेकरून पृथ्वीच्या पाठीवरील जैवविविधतेचे संरक्षण व्हावे.

या ठिकाणी कुणालाही जाता येत नाही. मुख्य म्हणजे हे ठिकाण अतिशय दुर्गम भागात आहे आणि त्या ठिकाणी अतिशय प्रतिकूल हवामान असते. त्यामुळे कुतव्याही धोक्यापासून बियाणे या ठिकाणी सुरक्षित आहे असे मानले जाते.

४) नंबर फोर एरिया फिफ्टी वन (अमेरिका) अमेरिकी हवाई दलाचा हा अतिशय गुप्त असा तळ आहे. या ठिकाणाबाबत अनेक कटकारस्थानांच्या अफवा आणि गोष्टी चर्चिल्या जात असतात. हे ठिकाण नेवाडातील वाळवंटात आहे आणि त्या ठिकाणी जाण्यास सर्वसामान्य नागरिकांना प्रतिबंध करण्यात आलेला आहे. या ठिकाणी केगेवेव्ह्या पद्धतीचे घातक संशोधनही केले जाते असेही सांगितले जाते.

५) माउंट वेदर इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर (अमेरिका) हे ठिकाण कर्जीया मधील ब्लू रिध पर्वतरांजीतील खोलवर ठिकाणी आहे. अमेरिकेतील सरकारचा करभार चालवण्यासाठी आणीबाणीच्या प्रसंगात बंकऱ्यम वोलकेशन म्हणून



याचा वापर करण्याचे नियोजन आहे. अमेरिकी सरकार वर जर का आणीबाणीची परिस्थिती ओढवली तर वॉशिंग्टन खेरीज अन्य सुरक्षित ठिकाणहून सरकारचा कारभार चालवता यावा यासाठी या ठिकाणी सर्व अत्याधुनिक यंत्रणा तसेच बंकर्स उभारण्यात आलेले आहेत. ही सर्व यंत्रणा जमिनीखाली कार्यरत असते. त्यामुळे अर्थातच या ठिकाणी सर्वसामान्य नागरिकांना प्रवेश दिला जात नाही.

६) व्हॅटिकन सिक्रेट अर्काईव्ह्ज (व्हॅटिकन सिटी) ह या ठिकाणी गुप्त अशी ऐतिहासिक कागदपत्रे आणि पोप यांचा पत्रव्यवहार तसेच हस्तलिखिते ठेवण्यात आलेली आहेत. हजारो शतकांचा हा ठेवा अतिशय महत्त्वाचा असल्याने या ठिकाणी जाण्यास सर्वसामान्य नागरिकांना प्रतिबंध करण्यात आलेला आहे. या संदर्भात संशोधन करणारे खरेखूरे संशोधक यांनाच अपवाद म्हणून परवानगी दिली जाते. या सर्व गुप्ततेमागे अनेक अफवा देखील सांगितल्या जातात, तसेच काही दंतकथा देखील सांगितल्या जातात.

७) उत्तर सेंटीनेल बेट (भारत) ह हे ठिकाण बंगालच्या उपसागरात अंदमान निकोबार बेटांच्या जवळ आहे. उत्तर सेंटिनल बेटांवर मूळ आदिवासी जमातीचे लोक आजही राहतात आणि बाहेरच्या लोकांना येण्यास ते अतिशय निकराने विरोध करतात. या ठिकाणी बाहेरून कोणी जाण्यास चा प्रयत्न केल्यास मूळ आदिवासी लोक त्याला ठार मारण्यास मागेपुढे पाहत नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे तेथील स्थानिक आदिवासी लोकांमध्ये प्रतिकारशक्ती कमी असण्याची शक्यता असून त्यामुळे अन्य भागातील नागरिक तिथे गेल्यास त्यांना संसर्ग होऊन मृत्यू होण्याची शक्यता वर्तवली जाते. त्यामुळे देखील बाहेरच्या लोकांना त्या ठिकाणी जाण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. हा भारत सरकारने संरक्षित भाग म्हणून जाहीर केलेला आहे.

८) ग्रीन शी ह्आंग ची कबर ह चीनमधील दोन हजार वर्षपूर्वीच्या या संग्रहालयात चिनी स्प्रइट ग्रीन शी ह्आंग याच्याशी संबंधित योद्ध्यांचे अनेक पुतळे आहेत. याची रचना पिरॅमिडप्रमाणेच आहे. ही कबर म्हणजे चीनमधील एक मोठा संस्मरणीय साठा असल्याचे सांगितले जाते. या कबरीच्या खाली खूप मोठा जागा असून त्या ठिकाणी जाण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. या ठिकाणी कुठले खोदकाम तसेच संशोधन करण्यास चीन सरकारने बंदी घातलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी कोणालाही जाता येत नाही.

आईसलँडखालील ज्वालामुखीचा धोका

देशाचे नाव आहे 'आईसलँड'. या बर्फाच्छादित थंड देशाच्या जमिनीखालील स्थिती मात्र वेगळीच आहे. या आईसलँडच्या खाली पृथ्वी जणू उकळत आहे. आईसलँडच्या रेक्जेन्स बेटावरील ज्वालामुखी सुमारे ८०० वर्षे शांत राहिल्यानंतर आता अचानक सक्रिय झाले आहेत. २०२१ नंतर तेथील ज्वालामुर्खाचा आठ वेळा उद्रेक झाला आहे. नव्या संशोधनात आढळले आहे की, ही ज्वालामुर्खाच्या उद्रेकांची मालिका इतक्या लवकर थांबणार नाही. आईसलँडमध्ये अनेक दशके पृथ्वीच्या पोटातील तप्त लाव्हा बाहेर येत राहील!

सहा देशांच्या संशोधकांच्या पथकाने याबाबत संयुक्त संशोधन केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, या ज्वालामुखीय हालचालींमागे मॅन्थाच एक उथळ सेतू असून, तो केवळ दहा किलोमीटर रुंदीचा आहे. हा मॅन्था पृथ्वीच्या पृष्ठभागापासून केवळ नऊ ते बारा किलोमीटर खोलीवर आहे. संशोधकांना वाटते की, हा मॅन्था रेक्जेन्स बेटावर अनेक दशके ज्वालामुर्खाचा उद्रेक सुरू ठेवू शकतो. या संशोधनाचे नेतृत्व स्वीडनच्या उप्साला युनिवर्सिटीतील जियोलॉजिस्ट व्हॅलेंटाईन ट्रोल यांनी केले. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'टेरा नोवा' मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. ट्रोल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ज्वालामुखी स्फोट आणि भूकंपाच्या 'हुंडी'तून मिळालेल्या भूकंपीय लहरींच्या आकडेवारीचा संशोधनासाठी वापर केला. त्यांनी नैऋत्य आईसलँडमधील रेक्जेनेस बेटाच्या पृष्ठभागाचे एक मानचित्रही बनवले. विशेष म्हणजे देशाची बहुतांश लोकसंख्या याच परिसरात राहते. मॅन्था पुलाची ओळख झाल्यानंतर आता त्यांच्ही मॉपिंग केले जाऊ शकते. भविष्यात येथील लोकांना करंबार स्थलांतरित व्हावे लागू शकते.

आयनमंडवर जाणारी वीज !

अमेरिकन अंतराळ संशोधन संस्था 'नासा'कडून अनेक वेळा अनोखी छायाचित्रे शेअर केली जात असतात. आताही 'नासा'ने असेच एक अनोखे छायाचित्र शेअर केले आहे. त्यामध्ये वीज ढगांमधून जमिनीवर नव्हे, तर वर अंतराळाच्या दिशेने जात असल्याचे दिसून येते. हिमालयाच्या परिसरात ही घटना घडल्याचे सांगितले जाते. गेल्या आठवड्यात 'नासा'च्या 'अॅस्ट्रॉनॉमी पिक्चर ऑफ द डे'कडून हा फोटो शेअर करण्यात आला. अशा प्रकारच्या विजेच्या घटनेबाबत या शतकातच संशोधन झालेले आहे.

या छायाचित्रात चार लांबच लांब ब्लू जेट अंतराळाकडे जात असताना दिसतात. सर्वसामान्य वीज ही जमिनीच्या दिशेने येत असते; मात्र ही वीज वादळाचे ढग आणि पृथ्वीच्या आयनमंडलाच्या मधील अंतर कापते. वादळाचे रंगही केगेवळे असतात, ज्यामधून असे ब्लू जेट निघतात.

३४ हजार वर्षापूर्वीच्या वाळवीच्या टेकड्या

या प्राचीन छोट्या टेकड्यांना 'ह्युक्लेट्जीस' असे म्हणतात.

संशोधकांनी दक्षिण आफ्रिकेत जगातील सर्वात प्राचीन वाळवीच्या टेकड्या शोधून काढल्या आहेत. या टेकड्या तब्बल ३४ हजार वर्षांपूर्वीच्या आहेत. यापूर्वी करण्यात आलेल्या अनुमानापेक्षा त्या पुष्कळ जुन्या असल्याचे नव्या रेडिओकार्बन डेटिंगने समजले आहे. युरोपमधील गुहेतील भित्तीचित्रे किनवा 'लास्ट स्पेसियल मॅक्झिमम' पेक्षाही या टेकड्या जुन्या आहेत.

याबाबतच्या संशोधनाची माहिती 'सायन्स ऑफ द टोटल एन्व्हायन्मेंट' मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. मुख्य संशोधक मायकल फ्रान्सिस यांनी याबाबतची माहिती दिली. वाळवीच्या वारुळांच्या या टेकड्या आहेत. नामाक्वालँडमधील बफेल्स रिव्हर या नदीच्या काठी या टेकड्या आहेत. हा परिसर दक्षिण आफ्रिकेच्या पश्चिम किनारपट्टीजवळ आहे. तेथील सुमारे २० टक्के भूभाग अशा टेकड्यांचाच आहे. स्थानिक लोक या टेकड्या सर्दन हार्वेस्टर टर्माइट्स् किंवा 'मायक्रोहोडोर्मिस व्हिएटर' या वाळवीच्या आहेत. या वाळवींनी पेखरून आणलेले लाकडाचे कणही त्यांच्या या घरांमध्ये स्मारीष्ट आहेत. काळाच्या ओघात या जैविक सामग्रीचा विगार वाढत गेला आणि त्यांनी या छोट्या टेकड्यांचे रूप धारण केले.

या टेकड्या अर्थात कार्बनने संपन्न असा एक साठा बनला आहे. मातीमधील सूक्ष्म जीव या कार्बनचे रूपांतर कॅल्शियम कार्बोनटमध्ये करतात. मुसळधार पावसाच्या वेळी या टेकड्यांमधील कॅल्शियम कार्बोनेटची कार्बोनिक ॲसिडबरोबर रासायनिक प्रक्रिया होऊन वातावरणीय कार्बन डायऑक्साईड पावसाच्या पाण्यात विरघळतो. या प्रक्रियेमुळे नवा कार्बन जमिनीखाली तीन फूट खोलीवर अडकून राहतो.

कतार परिक्रमेचा विश्वविक्रम

कतारमध्ये १४ वर्षांपासून राहणारे विमान तंत्रज्ञ आशुतोष प्रकाश यांनी सर्वात जलद कतार शहराला पक्षिमा घालण्याचा नवीन गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड स्थापित करून ऐंथलेटिक इतिहासाच्या रेकॉर्डमध्ये आपले नाव कोरले आहे.आशुतोष प्रकाशने केवळ १ दिवस, ६ तास आणि ३१ मिनिटांत हि अविश्वसनीय कामगिरी केली, ज्याला गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने अधिकृतपणे मान्यता दिली.

या यशापर्यंतचा प्रकाशचा प्रवास या विक्रमी प्रयत्नाच्या खूप आधीपासून सुरू झाला.एका

दशकहून अधिक काळ धावपटू असलेल्या, आशुतोषने हळूहळू, त्याचे लक्ष अंतरावरून वेगाने हलवले.हा विक्रमी प्रयत्न त्याच्या अनेक वर्षांच्या समर्पणाचा कळस होता आशुतोषचा मार्ग शहरी केंद्रापासून दुर्गम वाळवंटापर्यंत, कतारच्या विविध लँडस्केपमधून गेला.तीव्र हवामान, क्रोप न लागणे आणि शारीरिक थकवा या समस्यांचा सामना करूनही प्रकाशने धीर सोडला नाही

यापूर्वी प्रकाशने दुबई ते कतार हे ७३९.५ किमी अंतर पूर्ण केले होते ज्याला ११ दिवस आणि १७ तास लागले होते.विशेष म्हणजे, यामुळे या सीमा ओलांडून धावणारा तो पहिला व्यक्ती बनला त्याच्या या विक्रमी प्रवासात लोक, विशेषतः अधिकारी आणि महिलांतील उपासक अन्न, पाणी आणि निवारा देत होते मला लोकांना, विशेषतः तरुण पिढीला सक्रिय जीवनशैली स्वीकरण्यासाठी प्रेरित करायचे आहे अशी प्रतिक्रिया प्रकाश यांनी दिली.

धावण्याने माझे जीवन अनेक सकारात्मक मार्गांनी बदलले आहे आणि मला आशा आहे की माझा प्रवास इतरांना स्वतःची सुरुवात करण्यास प्रवृत्त करेल. आपल्या मुलाला प्रेरणा देणे आणि त्याच्यासाठी एक आदर्श निर्माण करणे ही मुख्य प्रेरणा आहे यावर त्यांनी भर दिला.

वितळला लिंकनचा मेणाचा पुतळा !

येत आहे. हा संपूर्ण आठवडाभर तापमान जास्त राहील, असे तेथील हवामान विभागाने म्हटले आहे. हा पुतळा वॉशिंग्टन डीसीमध्ये कॅम्प बार्करच्या साईटवर आहे. हे सिल्हिल वॉच्या काळातील शरणार्थी शिबिराचे ठिकाण होते. तिथे गुलामीतून मुक्त केलेले आफ्रो- अमेरिकन लोक राहत होते. आता तिथे एक प्राथमिक शाळा आहे. तेथील हा मेणाचा पुतळा व्हर्जिनियामधील सँडी व्हिल्यम्स या कलाकाराने बनवला होता.

यंदा अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनमध्येही सध्या उष्णतेच्या झळांनी लोक हैराण आहेत. तिथे खूप्या जागेत ठेवलेला अब्राहम लिंकन यांचा मेणाचा पुतळाही वितळला आहे! अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांचा हा सहा फूट उंचीचा पुतळा शहरातील वाढलेल्या तापमानामुळे चक्क वितळला आणि लिंकनसाहेबांनी मान टाकली ! विशेष म्हणजे ३७ अंश सेल्सिअस तापमानात्तच पुतळ्याची ही अवस्था झाली. या पुतळ्याच्या डोक्यावरबोबरच पायही वितळले आहेत. सध्या या पुतळ्याला बंदिस्त जागेत ठेवून त्याची डागडुजी करण्यात आहेत. तिच्या स्टाफमधील लोक या ड्रेसची ट्रॅल सांभाळत असताना दिसत होते. दरम्यान, कॅटी पेरी ही गाण्यांमध्ये कमबॅक करणार आहे. 'वुमन्स वर्ल्ड' हा तिचा सहावा स्टुडिओ अल्बम आहे, तर २०२० मध्ये रिलीझ झालेल्या 'स्माईल' या तिच्या अल्बमनंतर रिलीज झालेला पहिला अल्बम असेल. कॅटी पैरी काही दिवसांपूर्वी झालेल्या अंनत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या दुसऱ्या प्री-वेडिंग फंक्शनमध्ये दिसली होती. तिच्या परफॉर्मन्सचे व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले होते.

पाचशे फूट लांबीचा ड्रेस

तिनं तब्बल ५०० फूट लांबीचा ड्रेस परिधान केला होता! सोशल मीडियावर कॅटी पेरीचा हा व्हिडीओ व्हायरल होतोय.

उत्तरशतान दिसले. यावेळी तिनं बॅलेनियागाचा लाल रंगाचा ड्रेस परिधान केला आहे. सुरुवातीला वाटलं की, तिनं वन शोल्डर मिनी ड्रेस परिधान केला आहे. मात्र, तो जेव्हा हॉटेलच्या पायऱ्या चढत होती, त्यावेळी तिचा हा ड्रेस संपतच नव्हता! हा ड्रेस तब्बल ५०० लांब आहे, असं तिच्या फॅन पेजवर सांगण्यात येत आहे. तर तिच्या या ५०० फूट लांब असलेल्या या ड्रेसच्या ट्रेलचा कॅटी पेरीच्या 'वुमन्स वर्ल्ड' गाण्याच्या ओळी

हत्तीही हाक मारतात नावाने!

केवळ माणसंच नव्हे तर हत्तीही एकमेकांना 'नाव'ने ओळखतात असे एका नव्या संशोधनातून पेरिसून आले आहे! निसर्गाची अनेक गुपिते मानवाला ब्रह्म करीत असतात. 'मानव' ह्य या पृथ्वीतलावरील बोलणारे एकमेव प्राणी आहे. आपण जसे बोलतो. बोलण्याच्या माध्यमातून आपण आमच्या भावना इतरांपर्यंत पोहोचवत असतो. परंतु, आमच्यासारखेच इतर प्राणी, पक्षी हे एकमेवंशंशी संवाद साधत असतात. यांचे अनेक उदाहरणे आपण पहिले आहेत.

आता नुकत्याच प्रकाशित झालेल्या या नवीन संशोधनानुसार आफ्रिकन हत्ती एकमेकांना हाक मारतात आणि वैयक्तिक नावांना प्रतिसाद देत असल्याची माहिती समोर आली आहे. हत्ती नावे पुकारताना आपल्या चित्कारण्यातील विविध आवाजांचा वापर करतात लांबवर असलेल्या कळपातील कोणालाही बोलावण्यासाठी विविध नावे वापरतात असे संशोधनात सांगण्यात आले आहे. आपल्याला माहीत आहे की, माणसांना जसे नावे असतात तसेच पाळीव प्राण्यांना नावेदेखील असतात आपण त्यांना हाक मारली की ते लगेच धावत येतात.

तसेच हत्तीदेखील आपल्या सदस्यांना हाक मारत त्यांच्याशी संवाद साधतात, असे संशोधनात नमूद करण्यात आले आहे.

नेचर इकोलॉजी आणि इव्होल्यूशनमधील अभ्यासासाठी, केनियाच्या सांबुरू नॅशनल रिझर्व्ह आणि अंबोसेली नॅशनल पार्कमध्ये रेकॉर्ड केलेल्या हत्तींच्या आवाजाच्या लायब्ररीमध्ये नावांचा वापर शोधण्यासाठी जीवशास्त्रज्ञांनी मशिन लर्निंगचा वापर केला आहे. संशोधकांनी जीपमध्ये हत्तींचा पाठलाग करून कोणी हाक मारली आणि कोणी प्रतिसाद दिला याचा शोध घेतला केवळ ऑडिओ डेटाचे विश्लेषण केले. कार्नेल विद्यापीठाचे जीवशास्त्रज्ञ मिकी पारडो यांनी अधिक माहिती दिली आहे. ते म्हणाले की, ''मानवांप्रमाणेच, हत्तीही नावे वापरतात; परंतु बहुसंख्या उच्चारांमध्ये कधी कधी जास्त नावे वापरत नाहीत, म्हणून आम्ही १०० टक्के अपेक्षा करणार नाही.''

शुद्धीतावस्थेतच केले किडनी प्रत्यारोपण : जगातील पहिला प्रयोग

अमेरिकेतील डॉक्टरांनी एका रुग्णावर किडनी प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे आणि तीही ही रुग्ण पूर्णपणे शुद्धीत असताना ! नुकतीच शिकागोच्या नॉर्थवेस्टर्न मेडिसिन हॉस्पिटलमध्ये या जॉन निकोलस नावाच्या माणसावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली. या संपूर्ण शस्त्रक्रियेवेळी जॉन पूर्णपणे शुद्धीत होता व जे घडत होते ते पाहत होता! जनरल ॲनेस्थेटिक शिवायच त्याला ही नवी किडनी देण्यात आली. दुसऱ्या दिवशीच हा रुग्ण घरीही गेला!

अर्थात जगात अशा पद्धतीने झालेली ही पहिलीच शस्त्रक्रिया नाही. मात्र, तरीही ही काही सर्वसामान्यपणे नेहमी घडणारी घटना नाही. २८ वर्षांच्या या तरुणाला घोबीस तासांतच घरी जाऊ देण्यात आले. एएची किडनी ट्रान्सप्लंट झालेल्या रुग्णाला अनेक दिवस रुग्णालयात राहावे लागत असते. किमान आठवड्यभर तरी असे रुग्ण रुग्णालयात असतात. निकोलसवर शस्त्रक्रिया करण्यापूर्वी डॉक्टरांनी माणवयाच्या खालील भागात ॲनेस्थेटिक दिले होते.

शस्त्रक्रियेदरम्यान डॉक्टर त्याला तणावरहीत ठेवण्यासाठी हास्यविनोदी करीत होते. ही शस्त्रक्रिया सुमारे दोन तास सुरु होती. या काळात निकोलसला कोण्त्याही वेदना जाणवल्या नाहीत. शस्त्रक्रियेवेळी तर त्याने आपल्या शरीरात बसवली जाणारी नवी किडनीही कुतुहलाने पाहिली.

ही किडनी त्याच्या एका मित्राचेच दान केलेली आहे. आता हॉस्पिटलमध्ये एका पत्रकार परिषदेत डॉक्टर व निकोलसने याबाबतची माहिती दिली आहे. निकोलसला तो सोळा वर्षांचा असल्यापासूनच किडनीच्या समस्या सुरू झाल्या होत्या. त्याच्यावर किडनी प्रत्यारोपण करण्याची गरज असल्याचे निष्पन्न झाले होते. १९५४ मध्ये जगातील पहिली किडनी प्रत्यारोपणची शस्त्रक्रिया झाली होती.

ग्रामीण भागातून पुढे येऊन व बिकट परिस्थितीवर मात करून सीए झालयाबद्दल तन्मय बंडू पुंड याचा शहादये ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात सन्मान करण्यात आला. श्री विशाल गणपती मंदिर देवस्थानचे विश्वस्त तथा शहर बीजेपी संचालक प्रा. माणिक विघाते यांनी त्याचा सत्कार केला. यावेळी देवस्थानचे उपाध्यक्ष पंढिरराव खरपुडे, खजिनदार पांडुरंग नव्हरे, सहखजिनदार रंगनाथ फुलसौंदर, मयूर भापकर, उद्योजक शक्तिकांत घिये, बबनराव गोरे, सब रजिस्ट्रार दिलीप गायकवाड, भाऊसाहेब पुंड, धीरज आमरकर आदी.

प्रवीण तनपुरे सी.ए. परीक्षा उत्तीर्ण

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटन्ट ऑफ इंडिया (आय सी ए आय) च्या वतीने मे –२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या सीए फायनल परीक्षेत प्रवीण झानेश्वर तनपुरे उत्तीर्ण झाला आहे. त्याने आर्टिकलशिप पिंपरी चिंचवड येथील सीए संतोष राका यांच्याकडे केली व त्याला सी ए प्रसाद भंडारी, सीए अमृत पटेल, आणि सीए संदीप देसारडा यांनी मार्गदर्शन केले.

आईच्या मेहनतीमुळेच प्रवीणने हे यश प्राप्त केले आहे. त्याने सांगितले की, माझ्या आईने नेहमीच मला शिक्ष्यप्रास पोत्साहित केले. तिच्या कठोर परिश्रमामुळे आणि माझ्या गुरुंच्या मार्गदर्शनामुळेच मी हे यश मिळवू शकलो. त्याच्या आईने कपड्याचा दुकानात काम करुन आपल्या मुलाला शिकवले.

रोहन बोरा सीए फायनल परीक्षा उत्तीर्ण

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडीया (आय. सी.ए.आय.) च्या वतीने मे २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या सीए फायनल परीक्षेत येथील रोहन बोरा हे चांगल्या गुणांनी व स्ट्रॅटेजिक फायनान्सियल मॅनेजमेंटमध्ये १०० पैकी ८१ गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. त्याने आर्टिकलशीप बी.डी.ओ. पुणे येथे केले. सी.ए. अशोक पितळे, सीए गौरव पितळे, सीए अमय पतळे यांचे त्याला मार्गदर्शन लाभले. नगर मधील उद्योजक सुरेशलाल धनराज बोरा यांचा रोहन हा नातू आहे तर वडील सचिन सुरेशलाल बोरा व आई दिपाली बोरा यांचे त्याला विशेष प्रोत्साहन व पाठबळ लाभले.

सेजल मुनोत सी.ए. फायनल परीक्षा उत्तीर्ण

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंन्टस् ऑफ इंडियाच्यावतीने घेण्यात आलेल्या मे २०२४ च्या फायनल सी.ए. परीक्षेमध्ये सेजल राहुल मुनोत (पुणे) ही चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. दहावी परीक्षेत तिने सेंट ॲन्स शाळेतून प्रथम क्रमांक मिळविला होता. आर्टिकलशीप तिने पुणे येथील कल्याणीवाला मिस्त्री यांच्याकडे पूर्ण केली. राहुरी इलेक्ट्रीकल्सचे विजय, संजय यांची सेजल पुतणी आहे. तिला वडील राहूल, आई पंकजा व माऊ रोनक यांचे प्रोत्साहन लाभले.

ऑकार रायकवाड सीए परीक्षा उत्तीर्ण

नगर – येथील ऑकार रायकवाड यांने सी ए अंतिम परीक्षेत यश संपादन केले. मिंगार येथील रहिवासी, अहमदनगर डाक विभागातील सहकारी व सध्या पुणे प्रधान डाकघर येथे सहायक पोस्टमास्तर म्हणून कार्यरत असणारे सतिष कृष्णराव रायकवाड यांचे चिरंजीव आहे. त्याची कन्या कु वैष्णवी हिला २०२३ मध्ये सी ए अंतिम परीक्षेत घवघवीत यश मिळाले. दोन्हीही मुलांनी सलग दोन वर्षात मिळवलेले यश ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे. ऑकार यांचे आठवीपर्यंतचे शालेय शिक्षण सावेडी अनगर मधील रेणावीकर विद्यालय येथे घेतले.ऑकार यांचे दहावी पर्यंतचे शिक्षण भावे हायस्कूल सदाशिव पेठ पुणे तर बी कॉम पदवी एस पी कॉलेज पुणे येथून पदवी घेतली. सीए आर्टिकलशिप कोथरुड पुणे मधील फर्म श्री चांदोरकर– लिमये यांच्याकडे पूर्ण केली. याच फर्मच्या अनोमल मार्गदर्शनात ऑकार याने मे २०२४ झालेल्या अंतीम परीक्षेत यश मिळवले.

प्रणाली सुसे सी.ए. उत्तीर्ण

नगर – मिंगारच्या माळगट्टी येथे राहणारी प्रणाली अर्जुन सुसे ही सी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. मिंगार हायस्कूलमध्ये शिक्षण घेतल्यानंतर तिने शाम भट्टड (पुणे) यांच्या सहकार्यानं सी.ए. चा अभ्यास पूर्ण केला. तिला देसर्डा–भंडारी क्लासेसच्या शिक्षकांचे यासाठी मोलाचे मार्गदर्शन मिळाले. ती युनियन बँकेत कॅशिअर म्हणून कामाला असलेले अर्जुन सुसे (रिटायर्ड आर्मी) यांची मुलगी आहे. तिची आई उषा आणि भाऊ प्रतीक यांचेही मोलाचे सहकार्य तिला मिळाले.

आदित्य शहा याचे सीए परीक्षेत यश

नगर – नुकत्याच इन्स्टिट्यूट चार्टर्ड अकाऊंटंट परीक्षेत नगर येथील आदित्य अनिल शहा यांचे उत्तीर्ण झाला. त्याला त्याचे ज्येष्ठ बंधू सीए आशितोष अनिल शहा, संदीप सुमतीलाल शहा, देसरडा व भंडारी सर आदींचे मार्गदर्शन लाभले.

आदित्यचे इयत्ता बारावी पर्यंतचे शिक्षण तासगावमध्ये झाले. नंतरचे शिक्षण नगरमध्ये झाले.

प्रतिक मुथा सी.ए. परिक्षा उत्तीर्ण

नगर – येथील प्रतिक सुशिल मुथा हे इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टस् ऑफ इंडियाच्यावतीने मे २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या सी.ए. फायनल परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. प्रतिक यांनी नगर येथील सी.ए. महेश भळगट फर्ममध्ये आर्टिकलशिप पूर्ण केली. नगर अर्बन बँकेसमोरील शेयर खान फ्रॅन्चाईजचे चालक प्रसिद्ध शेयर ब्रोकर सुशिल मुथा यांचे प्रतिक हे चिरंजीव आहेत. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन करुन पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

पाऊस ओसरल्याने मुळा, भंडारदरामध्ये पाण्याची आवक मंदावली

नगर – उत्तर नगर जिल्ह्यासाठी वरदान असलेल्या भंडारदरा आणि मुळा धरणाच्या पाणलोटात अधूनमधून पाऊस होत आहे. त्यामुळे या दोन्ही धरणांसह निळवंडे धरणात सुरु असलेली पाण्याची आवक मंदावली आहे.

भंडारदरा धरणात गत २४ तासांत केवळ २६६ दलघफू पाणी दाखल झाले. एकूण ११०३९ दशलक्ष घनफुट क्षमतेच्या भंडारदरातील पाणीसाठा गुरुवारी (दि.११) सायंकाळी ३६२२ दलघफू झाला होता. भंडारदरा परिसरात पाऊस कमी असल्याने गत २४ तासांत निळवंडे धरणात ६० दलघफू पाणी आले. त्यामुळे या धरणातील पाणीसाठा १२०७ दलघफू पाणीसाठा झाला होता.

गत २४ तासांत भंडारदरा १ मिमी, घाटघर २७ मिमी, पांजरे १९ मिमी, रतनवाडी ७७ मिमी अशी पावसाची नोंद झाली आहे. मुळा धरणाच्या पाणलोटातही पाऊस अचानक ओसरल्याने मुळा नदीतील विसर्ग घटला आहे. परिणामी धरणाकडे येणारी आवक मंदावली आहे. मुळा धरणातील पाणीसाठा ७४९२ दलघफू (२८.८२ टक्के) झाला होता. मुळा नदीचा कोतूळ येथील विसर्ग ८८६ क्युसेक होता. आढळा धरणात ११ दलघफू पाण्याची आवक झाली असून पाणीसाठा ४६३ दलघफू झाला आहे.

होमगार्ड जवानांना १८० दिवस काम देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करा

मागील अधिवेशनात निर्णय जाहीर करुनही अंमलबजावणी नाही : आ. सत्यजीत तांबे

मुंबई – राज्यात पोलिस कर्मचाऱांची संख्या अत्यंत कमी आहे. पोलीस कर्मचाऱांची संख्या कमी असल्यामुळे राज्यात होमगार्डचा वापर केला जातो. मात्र होमगार्ड जवान अनियमित सेवेत असल्यामुळे जेव्हा गरज असते, तेव्हा काम दिले जाते. त्यामुळे अनेक वर्षापासून होमगार्ड जवानांची मागणी आहे की, किमान १८० दिवस काम मिळाले पाहिजे. जेणेकरुन त्यांचा उदरनिर्वाह चालू शकतो. होमगार्ड जवानांच्या या मागणी बद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागच्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र गृह रक्षक दल (होमगार्ड) जवानांना किमान १८० दिवस काम देण्याचे निर्णय जाहीर केला होते. मात्र अजून या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याने तातडीने निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात केली.

राज्यामध्ये कोणताही सण असेल, वाहतुक पोलीसांच्या मदतीसाठी गृहरक्षक दलांतील जवानांना ड्युटी दिली जाते. सध्या पोलीसांना कायदा व सुव्यवस्था राखण्यात मदत करण्यासाठी या जवानांची मदत घेतली जाते. त्याचबरोबर एखाद्या आरोपीला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यात किंवा त्यांना वैद्यकीय मदतीसाठी ने–आण करण्यात होमगार्डची मदत होते. राज्यात सध्या ५३ हजार होमगार्ड कार्यरत आहेत. होमगार्ड जवानांना देखील राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे सगळ्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात केली.

महाराष्ट्रात वेळोवेळी या होमगार्डस जवानांना वर्षभर काम देण्याची मागणी करण्यात येत आहे. त्याचबरोबर त्यांना निश्चित वेतन मिळावं यासाठीही प्रयत्न सुरु आहेत. सध्या होमगार्डसना कोणत्याही प्रकारचे निश्चित वेतन नाहीये. ज्या दिवशी काम असते, त्याच दिवसाचे पैसे त्यांना मिळतात. इतर दिवशी त्यांना रोजगाराचे दुसरे साधन शोधावे लागत असल्यामुळे होमगार्ड जवानांना १८० दिवस काम देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने केली पाहिजे, असे आ.सत्यजीत तांबे यांनी म्हटले आहे.

अखिल भारतीय किसान सभेची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

जिल्हा अध्यक्षपदी कॉ. बबनराव सालके व सचिवपदी कॉ.अप्पासाहेब वाबळे यांची नियुक्ती

नगर – अखिल भारतीय किसान सभेची जिल्हा शाखेची बैठक नुकतीच बुरुडगाव रोड येथील माकपच्या पक्ष कार्यालयात पार पडली. ज्येष्ठ नेते कॉ. दशरथ हासे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत किसान सभेची जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

बैठकीच्या प्रारंभी अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय महासचिव कॉ. अतुलकुमार अंजान व अभ्रपूर्ण परिवाराचे संस्थापक तथा ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक कॉ. प्रेमाताई पुर्व यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.गेल्या दोन वर्षातील कामकाजाचा अहवाल जिल्हा सचिव कॉ.बन्सी सातपुते यांनी मांडला. त्यावर कॉ. लक्ष्मण नवले, बापु राशिनकर, श्रीधर आदीक, गोरख मोरे, भुलाबाई आदमणे, भारत अरगडे, ड. ज्ञानदेव शहाणे, बहिरनाथ वाकळे, रमेश नागवडे यांनी चर्चेत सहभागी होऊन किसान सभेचे काम अधिक जोमाने करण्यासाठी विविध सूचना मांडल्या.

शेतीमालाला हमी भाव मिळावा यासाठी केंद्र सरकारने कायदा करावा, हमी भावापेक्षा कमी दराने शेतीमाल खरेदी करणे कायद्याने गुन्हा ठरवला जावा, कांद्याला किमान ४ हजार रुपये हमी भाव द्यावा, दुधाला अनुदान नको तर गाईच्या दुधाला ४० रुपये तर म्हशीच्या दुधाला ६० रुपये हमी भाव द्यावा, पिक विमा कंपन्यांच्या लाभाचे धोरण बदलावे, कापसाला येत्या हंगामात १२ हजार रुपये हमीभाव जाहीर करावे, तर सोयाबीनला ७ हजार रुपये दर द्यावे, कृषी निविष्ठा, बी–बीयाणे किटकनाशके जीएसटी मुक्त करावे आदी मागण्यांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचा बैठकित ठराव करण्यात आला.

एकीकडे शेतीसाठी आवश्यक असणारे खते, बियाणे किटकनाशके यांची प्रचंड भाववाढ करुन शेतीमालाला किरकोळ आधारभूत किंमत वाढवून सरकार शेतकऱ्यांची चेष्टा करत असल्याबद्दल केंद्र सरकारचा यावेळी निषेध नोंदविण्यात आला. वरील मागण्यांसाठी शेतकऱ्यांना बरोबर घेवून तीव्र संघर्ष सुरू करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीचा समारोप गोरक्षनाथ काकडे यांनी नविन पदाधिकारी यांना शुभेच्छा देऊन केले.

अखिल भारतीय किसान सभेची जिल्हा कार्यकारिणी पुढील तीन वर्षासाठी राहणार आहे. नवीन कार्यकारिणीची नावे पुढीलप्रमाणे:–

अध्यक्ष– बबनराव सालके (पारनेर), सचिव– अप्पासाहेब वाबळे (नेवासा), सहसचिव हरीभाऊ गायवाड, प्रकाश नवले, कार्याध्यक्ष– प्रा.लक्ष्मण डांगे सर, उपाध्यक्ष– बापुराव राशिनकर, गोरक्षनाथ मोरे, सुरेश बागुल, ड. भागचंद उकिर्डे, महिला आघाडी उपाध्यक्ष सुलाबाई आदमाणे, कार्यकारिणी सदस्य– प्रा. बबनराव नवले, बहिरनाथ वाकळे, विकास गेरगे, कैलास शेळके, बाबासाहेब सोनपुरे, सुरेश पानसरे, धोंडीभाऊ सातपुते, प्रा. बबनराव पवार, पांडुरंग शिंदे, मारुती शिंदे, येल्लूबा नवले, अशोक डुबे, लता मेंगाळ यांच्यासह २१ जणांचा समावेश आहे. तसेच २१ जणांचे जिल्हा कौन्सील निवडण्यात आले असून, खजिनदारपदी भगवानराव गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे.

कृषी क्षेत्रातील विविध पुरस्कारांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

नगर – महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत राज्यातील कृषी आणि फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या शेतकरी, संस्था आणि गटांना विविध पुरस्कार दिले जातात. यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार, जिजामाता कृषीभूषण पुरस्कार, सेंद्रिय शेती कृषीभूषण पुरस्कार, उद्यानपंडीत पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार आणि पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कारांचा समावेश आहे.

या पुरस्कारांसाठी २०२३ या वर्षासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. शेतकरी, गट, संस्था यांनी २५ जुलै पर्यंत आपल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयात प्रस्ताव सादर करावा तसेच अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन अहमदनगर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

महसूल कर्मचाऱ्यांचे १५ जुलैपासून काम बंद आंदोलन

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी महसूल कर्मचारी संघटनेच्यावतीने निदर्शने करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी महसूल कर्मचारी संघटनेचे निदर्शने

नगर – महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्यावतीने महसूल विभागाची सुधारित आकृतीबंध दांगट समितीच्या अहवालातील शिफारसीप्रमाणे कोणत्याही संवर्गातील कर्मचारी कपात न करता लागू करावा व रिक्त पदे तातडीने भरण्यात यावे आदीसह विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र आंधळे यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र संघटनेचे उपाध्यक्ष अक्षय फलके, जिल्हा संघटनेचे सरचिटणीस स्वप्निल फलके, उपाध्यक्ष अशोक मासाळ, उपाध्यक्ष संतोष झाडे, मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष रावसाहेब निमसे, सुभाष तळेकर, अशोक मासाळ, अक्षय फलके, महिला अध्यक्ष वंदना नेटके, दिंबर करपे, नितीन मुळे, राजेंद्र लाड, शेखर साळुंखे, भरत गोरे, महेश म्हस्के, सुवर्ण वैद्य, शारदा आवटी, रूपाली बधे, अजय ढसाळ, ज्ञानेश्वर खोलम, दीपक चन्ने, संतोष धोंगडे, ठोंबरे, दातरंगे आदीसह जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनाच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन तसेच १५ जुलै रोजीपासून कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे.

संघटनेची प्रमुख मागणी महसूल विभागाची सुधारित आकृतीबंध दांगट समितीच्या अहवालातील शिफारशी प्रमाणे कोणत्याही संवर्गातील कर्मचारी कपात न करता लागू करावी त्यामुळे कर्मचारी संख्या वाढल्यास उपलब्ध कर्मचाऱ्यांवरचा कामाचा ताण कमी होणार आहे. तसेच रिक्त पदे तातडीने भरण्यात यावे अशी मागणी संघटनेने केलेली आहे. नायब तहसीलदार पदोन्नती, महसूल सहाय्यक यांची वेतन निश्चिती, अव्वल कारकून पदनाम बदलणेबाबत, संगाय व इतर योजनेचे कर्मचाऱ्यांचे वेतन उणे प्राथिकारपत्रावर काढण्याबाबत अशा अनेक मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले आहे.

बाणेश्वर महाविद्यालयात 'स्कूल कनेक्ट' कार्यशाळा

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत स्कूल कनेक्ट (नवीन शैक्षणिक धोरण २०२०) संदर्भात जागृती करण्याकरिता बारावी पास विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यासाठी एक दिवसीय कार्यशाळा १० जुलै रोजी बुऱ्हाणनगर येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे पार पडली.

या कार्यशाळेसाठी उद्घाटक म्हणून लाभलेले भाजप युवा मोर्चा अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष व बाणेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक अक्षय कळेंसे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच कार्यशाळेसाठी प्रमुख व्याख्याते म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रा. संदीप पालवे यांनी विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची उद्दिष्टे, प्रवेश, ज्ञान, गुणवत्ता, अभ्यासक्रम, कौशल्य आदि संकल्पना स्पष्ट करून हे रोजगारामिमुख शिक्षण असून व त्यातील महत्त्वाच्या बाबी निदर्शनास आणून दिल्या. तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी उपयुक्त ठरणार असून ते शिक्षणामध्ये परिवर्तन घडविण्याचे काम करणार अस्याच्या प्रतिपादन कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. जाधव यांनी केले. या कार्यशाळेसाठी श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे रजिस्ट्रार विलास बोर्डे उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी बारावी पास विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.

तसेच ही कार्यशाळा उत्कृष्टरित्या पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव कळेंसे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची सुरुवात स्कूल कनेक्टर संदर्भातील कार्यशाळेप्रसंगी बोलताना डॉ. प्रा. स्वाती वाघ. व्यासपीठावर अक्षय कळेंसे, प्राचार्य डॉ. विलास बोर्डे आदी.

विद्यापीठ गीताने झाली. या कार्यशाळेच्या समन्वयक म्हणून डॉ. स्वाती वाघ यांनी काम पाहिले. तर,आय. क्यू. एस .सी. चे समन्वयक डॉ. शेख आर.एच., महाविद्यालयातील प्राध्यापक रुंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यशाळेसाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. पुंडे एम.एन. व आभार डॉ. मुळे बी.एम. यांनी व्यक्त केले.

शेअर बाजारात पुन्हा तेजी, सेन्सेक्स व निफ्टीची ऐतिहासिक मुसंडी

मुंबई – भारतीय शेअर बाजारात आतिषबाजी सुरुच आहे. शेअर बाजार सातव्याने नवनवीन विक्रम करत असून शुक्रवारी (दि.१२) आठवड्याच्या शेवट्च्या व्यवहार दिवशी सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी नवीन ऐतिहासिक शिखरावर मुसंडी मारली आहे. जागतिक बाजारात चढ–उतार होत असताना भारतीय शेअर माकेटने जबरदस्त सुरुवात केली आणि तेजीत ओपनिंगनंतर नवीन शिखर गाठले.

शानदार तेजीच्या जोरावर बीएसई सेन्सेक्सने शुक्रवारी ८०,८९३.५१ अंकांच्या नवीन सर्वोच्च पातळीवर झेप घेतली तर, एनएसई निफ्टी २४,६०० अंकांच्या दिशेने अग्रेसर असून निर्देशांकाचा नवीन ऐतिहासिक उच्च पातळी २४,५९२.२० अंक आहे. आयटी निर्देशांकातील जबरदस्त तेजीचा देशांतर्गत मार्केटला पाठिंबा मिळताना दिसत असून अर्थसंकल्पापूर्वी गुंतवणूकदारही खरेदी करत आहेत.

आयटी निर्देशांक सध्या ३.५८ टक्के मजबूत वाढीसह टॅड करता असून १,३३६ अंकांनी वाढून दिवसाचा हिरो ठरला. गुरुवारी, शेअर मार्केट बंद झाल्यावर टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या देशातील मोठ्या आयटी कंपनीने जून तिमाहीचे अपेक्षेनुसार निकाल जारी केले ज्याचा परिणामी शुक्रवारी टीसीएस स्टॉकवर दिसून आला आणि शेअर सेन्सेक्स–निफ्टी या दोन्हींमध्ये टॉप गेनर ठरला. टीसीएस सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांकांमध्ये ४.३५ टक्के वाढीसह व्यवहार करत आहे.



अहमदनगर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने बी के प्रभा दीदी यांनी स्वामत केले व सावेडी येथील ध्यानधारणा केंद्राला भेटीचे निमंत्रण दिले. यावेळी बी के डॉ. दीपक हरके व बी के मुन्नी दीदी उपस्थित होते.

REQUIRED

Vacancies in reputed cement company located at ahmednagar for All department.

1) **Sales Assistant (M) - 3** (2 Wheeler, Compulsory Mobile)
2) **Sales Technical (M) - 3** (Civil Diploma)
3) **Account (M/F) - 3** (B.com, M.com, Tally)

Address : Durvankur Building, Bagadpatti Road, Saibaba Mandir, Ahmednagar-414001, 8623963979

दोन/तीन तासासाठी अकौंटंट पाहिजे

सोम,गुरु,शनिवार या दिवशी दोन/तीन तासासाठी अकौंटंट पाहिजे. टॅली येणे आवश्यक.

9422221380

पाईपलाईन रोडवरील १४० स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे

ओपीडी, मेडिकल, जनरल स्टोअर्स, ऑफिससाठी उपयुक्त.

8888351762
9923228111

600 sqft. Hall On Rent

अशी सुवर्णसंधी पुन्हा नाही..

दिल्लीगेट, सिद्धिबागे समोर, न्यु आर्ट्स कॉलेजरोड, अ.नगर येथे

अटॅच बाथरुम, सी.सी.टिव्ही., लिफ्टची सोय इ. सुविधायुक्त

600 स्क्वे.फूटाचा हॉल भाड्याने देणे आहे

- संपर्क -

Mo. 9270570699

जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह, अहमदनगर

सोनोग्राफी ₹500/- | नॉर्मल डिलिव्हरी ₹9000/- | सिझर डिलिव्हरी ₹19000/-

प्रसुतीगृह । शी रोग । कंत्यन्न निवारण । लेप्रोस्कोपी । शासमान्य गर्भपात केंद्र

जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह

पुणे बसस्टॅडजवळ, स्वस्तिक चौक, हॉटेल रॅडियन्सच्या पाठीमागे, अहमदनगर. मो. 74105 94116, फोन (0241) 7961062.

- पाहिजेत -

बिलिंग एक्झिक्युटिव्ह - २
विवाहित महिला, पदवीधर
अकौंटिंगचे ज्ञान असल्यास प्राधान्य.

सपोर्ट स्टाफ (हेल्पर) - २
दुकानात हेल्पर - १२वी पास/नापास, पुरुष : वय - १८ ते ३० वर्षे

- आकर्षक पगार | समक्ष भेटा -

मुंजोबा स्वीट्स बेजारी, श्री तुळजाभवानी मंदिराजवळ, माळीवाडा वेस, अहमदनगर

के. प्रकाश अंण्ड कंपनी (गार्डी) मो. 9665511179

पाहिजेत

टू-व्हीलर शोरूम करीता खालील जागा त्वरित भरणे आहेत

कॉम्प्युटर ऑपरेटर (M/F) ---→ **जागा-४**

पात्रता - ग्रॅज्युएट, कॉम्प्युटरचे संपूर्ण ज्ञान आवश्यक

पात्र उमेद्वारांना आकर्षक पगार दिले जाईल

संपर्क - 9420014634

पाहिजेत

अग्र.टी.आय.पेंटर डिप्लोमा कोर्स-(कालावधी २ वर्ष)
स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम पर्यवेक्षक)-(कालावधी १ वर्ष)
सेक्युरीटी अंण्ड फायर (अग्निशमन) (कालावधी ६ महिने)
सॅनिटरी इन्सपेक्टर (कालावधी १ वर्ष)
लॅण्ड सर्वेअर मोजणीदार (कालावधी ६ महिने)
डिझेल मेकॅनिक (कालावधी १ वर्ष)
कॉम्प्युटर टायपिंग (मराठी / इंग्रजी ६ महिने)

संपर्क - न्यु महाराष्ट्र कोकेशनल ट्रेनिंग सेंटर

शिवसागर प्रोव्हिजन स्टोअर्स मागे, सुशांत नगर, नगर-पुणे रोड, केडगाव, अहमदनगर

9762691281/9850846870/9325050977

जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह, अहमदनगर

सोनोग्राफी ₹500/- | नॉर्मल डिलिव्हरी ₹9000/- | सिझर डिलिव्हरी ₹19000/-

प्रसुतीगृह । शी रोग । कंत्यन्न निवारण । लेप्रोस्कोपी । शासमान्य गर्भपात केंद्र

जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह

पुणे बसस्टॅडजवळ, स्वस्तिक चौक, हॉटेल रॅडियन्सच्या पाठीमागे, अहमदनगर. मो. 74105 94116, फोन (0241) 7961062.

पाहिजेत

अहमदनगर जिल्ह्यामध्ये कामासाठी परदूर संस्थेने रिलयुरिटी गार्ड मागा+संभाजी, पुणतांबापासर, लेडी ऑफिस असिस्टंट पाहिजेत

मिश्रा सिक्युरिटी अंण्ड फायर सर्व्हिस

सदगुरु क्लासिक अपार्टमेंट, पतनगनर,विस्तवाग, नवीन तलाठी कार्यालयाजेळारी, सावेडी, अ.नगर

9422222241, 8888866073
8888889041

४ चाकी गाडी १५ दिवसात रिका

ते पण तुमच्या गाडीवर

मसुरकर पर्सनल कार ट्रेनिंग क्लासेस

7066148852

पाहिजेत

कॅशियर कम क्लार्क (पुरुष)

पात्रता-कॉमर्स शाखेचा पदवीधर, कॅम्प्युटरचे ज्ञान आवश्यक

शैक्षणीक पात्रतेच्या छायाकित प्रतिसह ८ दिवसात अर्ज सादर करावा

कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.

मुख्य कार्यालय: श्रीरंग अपार्टमेंट,स्वामी विवेकानंद चौक,शनि मंदिरासमोर, अ.नगर. फोन-०२४१ २३४५९८३ E mail : kailasnagari@ gmail.com

प्रवेश देणे चालू आहे

इलेक्ट्रिशियन -आय.टी.आय.पेंटर डिप्लोमा कोर्स-(कालावधी २ वर्ष)
स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम पर्यवेक्षक)-(कालावधी १ वर्ष)
सेक्युरीटी अंण्ड फायर (अग्निशमन) (कालावधी ६ महिने)
सॅनिटरी इन्सपेक्टर (कालावधी १ वर्ष)
लॅण्ड सर्वेअर मोजणीदार (कालावधी ६ महिने)
डिझेल मेकॅनिक (कालावधी १ वर्ष)
कॉम्प्युटर टायपिंग (मराठी / इंग्रजी ६ महिने)

संपर्क - न्यु महाराष्ट्र कोकेशनल ट्रेनिंग सेंटर

शिवसागर प्रोव्हिजन स्टोअर्स मागे, सुशांत नगर, नगर-पुणे रोड, केडगाव, अहमदनगर

9762691281/9850846870/9325050977

भाषण करायला शिका... लाखो लोकांसमोर निर्भयतेने बोला!

Art of Speech

आता **प्रथमच** अहिल्यानगरमध्ये...

फ्रि सेमिनार

रविवार, १४ जुलै २०२४ सकाळी १०:३० वा.

वक्तृत्वाचा पासवर्ड फक्त इथेच !

मार्केट्यार्ड, जिल्हा संघ संकुल नं.१, पहिला मजला, हमाल पंचायत जवळ,अ.नगर

मो.नं. 9860 927799, 9615 927799

EARTH's Green Library

Greenery for Every Space

Indoor Plants for your Home!

Get a Plant Today!

Indoor Plants | Potted Planters | Premium Planters
Garden Accessories | Garden Furniture | Garden Lightings

Amit Sanklecha 9923143334
Website : greenlibrary.in

Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

फक्त 15 मिनिटात सोने तारण कर्ज

प्रति तोळा ₹ 58000

9% व्याजदर

शुन्य टक्के प्रोसेसिंग फी

लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या.

अधिक माहितीसाठी संपर्क

7888219471, 94231 67850

बागडपट्टी, अहमदनगर

MONSOON OFFER

मान्सून च्या बरसल्या सरी .. गुरु सुपरमार्केट च्या ऑफर्स भारी !!

Guru PREMIUM DRY FRUITS

बदाम कॅलिफोर्निया 250G ~~₹ 285/-~~ ₹190/-	गोवा काजू 250G ~~₹ 280/-~~ ₹260/-	प्रि.किशमिश 250G ~~₹ 110/-~~ ₹85/-	अक्रोड मगज 250G ~~₹ 290/-~~ ₹275/-
रोस्टेड पिस्ता 250G ~~₹ 330/-~~ ₹300/-	काळा मनुका 250G ~~₹ 130/-~~ ₹125/-	मेडजोल खजूर 500G ~~₹ 1080/-~~ ₹699/-	स्पे.पिवळी खारीक 500G ~~₹ 185/-~~ ₹155/-
बेबी अंजीर 400G ~~₹ 210/-~~ ₹180/-	तुर्कील जर्दाळू 200G ~~₹ 330/-~~ ₹290/-	रोस्टेड काजू - बदाम अखरोट - पम्पकिन सीड जवस - मखाना	

गुरु सुपरमार्केट Since 2013 माऊली संकुलसमोर

झोपडी कॅन्टीन मागे, अहमदनगर फोन :०२४१-२४१७५७५

आपाडी एकादशीनिमित्त सोमवारी दुकान चालू आहे .

JIVAN JYOT MEDICAL FOUNDATION

What Happens Matter in The Field of Education Since 27 Years

J.J.M.F.

वस्त्रे हॉस्पिटल/केळकर समोर, बाजीराव कार्यालय मागे, उंबरमाळ रोड, अ.नगर.
मो. 88 30 68 57 32 / 9373560452

दर्जेदार शिक्षण **प्रवेश सूचना** दर्जेदार नोकरी

कालावधी : एक / दोन वर्ष पात्रता : दहावी, बारावी, पदवीधर (पास/नापास)

INSTITUTE OF PARA MEDICAL SCIENCES

1. **नर्सिंग कोर्सेस**
2. PGDMLT - P.G. Dip. in Medical Lab Tech
3. DMLT - Dip in Medical Lab Tech.
4. Operation Theater Assistant / Tech.
5. CCH / CGO / CCS - 2 Month (Dr. of any faculty)
6. Hospital Management
7. Dip. Course in Physiotherapy
8. X-Ray / ECG / C.T. Scan / MRI / Sonography / Dialysis Tech. / Cathlab Tech.
9. Dental Mechanics Technician (कृत्रिम दात व बत्तशी तयारकर्ता)
10. Dental Hygienist Tech.
11. Optometry / Optician Tech (चश्मे बनवणे, चश्मे, कलर व ड्रेस कलिंग,) Contact Lenses
12. Dental Assistant
13. Health & Sanitory Inspector

BOMBAY ACADEMY OF ARTS & EDUCATION

1. Pre School Teachers / Montesary Course. (बालवाडी / अंगणवाडी शिक्षिका)
2. Construction Supervisor (मापक अभियांत्रीकी सहायक) इंजनयरच परीक्षेत - (ITI कलम) (Assistant Engineer) जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका/नगरपालिका - नगरसेवा व इतर शासकीय दिवाणी नौकरीची संधी! डेव्हलपिंग उद्योग व्यवसाय परिसरी (वर्ग ४) शासनाच विकासी.
3. Computer Technology { Operating System, Graphics Designing, Website Designing, Software Developer, Networking, Database Operator }
4. Fire & Safety Management

उपरोक्त सर्व घटांसाठी मागणी जास्त व ओपेजार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी

Visit us : www.jjmf.info & Email: jjmf@rediffmail.com

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज

लालटाकी रोड, अहमदनगर-४१४ ००१. (महाराष्ट्र) फोन : ०२४१- २३२९६४९, २३२४८५०

- निविदा -

सुरक्षा रक्षक पुरविणे बाबत

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहमदनगर या संस्थेच्या आवारातील शाळा, महाविद्यालये, वसतीगृहे, प्रवेशद्वार, संस्था कार्यालय, सायकल स्टॅण्ड इ. ठिकाणी सुरक्षा रक्षक करार पध्दतीने नेमावयाचे आहेत. त्यासाठी मान्यताप्राप्त संस्थांकडून एक वर्षासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आतापर्यंतचा अनुभव, सेवा पुरविलेल्या संस्थांची नावे, नोंदणीपत्राची झेरॉक्स प्रत व आकारल्या जाणाऱ्या दरमहा मानधनाची रक्कम इत्यादी तपशीलासह निविदा शनिवार दि. २०-७-२०२४ रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत संस्था कार्यालयात दाखल कराव्यात.

आलेल्या निविदा स्विकारणे अथवा नाकारणे हा सर्वस्वी संस्थेचा अधिकार राहील.

अॅड. व्ही. डी. आठरे
सेक्रेटरी, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहमदनगर.

ENJOY YOUR HOLIDAY AT Manali

Volvo Package

3 Nights Accommodation
Breakfast I Dinner I Sightseeing by Private Car I Ex. Delhi

@ Just Rs. 6999/- PP

Limited Offer
July & August 2024

For more details Contact : 9226399555 9657746555
Pune : 9168055159 / 9819927017 Jalna : 9595150999
Nashik 9822181125 / 8145324403 Kada : 7030034041 / 9423471413

पगडी रस्म

स्व. मनोहर लालचंद चुग

सभी को सुचित करते है कि, **मनोहर लालचंद चुग** इनका गुरुवार ता. ११/०७/२०२४ को स्वर्गवास हुआ है ।

*** पगडी रस्म ***

शनिवार ता. १३/०७/२०२४ को, समय : शाम ५ से ५.३० बजे तक, स्थान : कृपाल आश्रम, मिस्कीन रोड, अ.नगर

- शोकाकूल -

चुग परिवार अ.नगर

फर्म : गुरुनानक रेडिमेड स्टोअर्स मोचीगल्ली, अ.नगर, मो : 9822027497

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज

लालटाकी रोड, अहमदनगर-४१४ ००१. (महाराष्ट्र) फोन : ०२४१- २३२९६४९, २३२४८५०

- निविदा -

मेस/कॅन्टीन चालविणेस देणे आहे

संस्थेच्या न्यू आर्टस्, कॉमर्स अंण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर या महाविद्यालयातील मुलांच्या वसतिगृहांमधील मेस व कॅन्टीन तसेच मुलींच्या वसतिगृहामधील मेस आणि न्यू आर्टस् कॉमर्स अंण्ड सायन्स कॉलेज, पारनेर या महावद्यालयातील मुलांचे वसतीगृह व मुलींचे वसतिगृहामधील मेस सुसज्ज स्थितीतील फर्निचरसह करारपध्दतीने अटी व शर्तीवर अन्नविक्रीची अधिकृत परवानगी असलेल्या परवानाधारकास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी चालविण्यास देणे आहे. या संबंधातील निविदांचे कोरे फॉर्मस दि. १९-७-२०२४ पर्यंत न्यू आर्टस् कॉमर्स अंण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर येथे कार्यालयीन वेळेत प्रॉपर्टी विभागात रु. ५००/-भरुन उपलब्ध होतील. इच्छुकांनी दि. २०-०७-२०२४ दुपारी २.०० वाजे पर्यंत पूर्ण भरलेल्या निविदा न्यू आर्टस् कॉमर्स अंण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर प्रॉपर्टी विभागात आणून द्याव्यात. निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.

डॉ. एल.एस.मतकर, प्राचार्य, न्यू आर्टस् कॉमर्स अंण्ड सायन्स कॉलेज, पारनेर

डॉ. बी.बी. सागडे, प्राचार्य, न्यू आर्टस् कॉमर्स अंण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर.

अॅड.व्ही.डी.आठरे, सेक्रेटरी, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहमदनगर.

|| भावपूर्ण आदरांजली ||

कै. लक्ष्मण बाळाजी पवार

स्व. दि. ०६/०७/२०२४

हास्य तुमच्या चेहऱ्याचे, आठवे पावलो पावली,
सन्मार्ग तुम्ही दाखविला, पण हरवली मायेची सावली...

|| दशक्रिया विधी ||

सोमवार दि. १५ जूलै २०२४ रोजी, सकाळी ८.३० वा.
स्थळ : अमरधाम, नालेगांव, अ.नगर येथे होईल.

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण आदरांजली..

- दुःखांकित -

अ.नगर महानगरपालिका
कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.
सर्व संचालक अधिकारी व कर्मचारी वर्ग

१५ वे दुःखस्मरण

आठवण तुमची प्रत्येक क्षणाला,
व्याकुळ करते आम्च्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आम्च्यात,
सदैव राहतील तुमच्या
आठवणी आम्च्या मनात..

|| आमचे प्रेरणास्थान ||

स्व. धोंडिरामजी सुखराजजी शिंगी

जन्म दि. २९/०८/१९४७, स्व. दि. १२/०७/२००९

आपल्या प्रेमळ स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली

शिंगी परिवार
अहमदनगर

डॉ.अद्वैत गिते

MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू,
पॅरेलीसीस * विसरालूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निझेन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

* सर्व आजारांसाठी ऐंडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

अक्षय (गिते) हॉस्पिटल

बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी ५ ते ५ या वेळेत